

साईबाबा भिक्षा मागताना



जानेवारी

६० पैसे

१९

# अनुक्रमणिका-जानेवारी १९७४


| | |
|---|---|
| १. संपादकीय | |
| २. श्रीसाईसच्चरित अ. १५ | श्री. द. शं. टिपणीस |
| ३. श्री. बाबा रामदास--चरित्र व वचने | श्री. भा. म. घारपुरे |
| ४. मी साईभक्त कसा झालो ! | श्री. मा. ग. गोरे |
| ५. रामगीतांजलि--(पुष्प ९ वे) | श्री. दिवाकर घैसास |
| ६. साईनाथ ललित चरित्र--३ | श्री. र. श्री. पुजारी |
| ७. आस, ओढ | श्री. वसंत गोखले |
| ८. संत कबीर | श्री. विनायक पाठक |
| ९. लक्षांत ठेवा | श्री. हे. घ. कुलकर्णी |
| १०. कविता | श्री. श्री. तु. नाईक |
| ११. श्रीगोंदवलेकर महाराज--व्यक्तिदर्शन | श्री. पु. मु. अत्रे |
| १२. साईमहिमा | श्री. दिनकर शिर्के |
| १३. अनंतपूजन | श्री. शाम जुवळे |
| १४. नमन श्रीदत्तगुरू | श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |
| १५. अनंतता | श्री. चिपळूणकर गुरूजी |
| १६. शिरडी वृत्त (नोव्हेंबर १९७३) | |


मुखपृष्ठ : धन्य ते जन जयांचे द्वारीं
बाबा होऊनि भिक्षेकरी......
पोरी आण गे चतकुर भाकरी
म्हणूनि पसरी निजकर ॥



# श्री साई वाक्सुधा

**जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥**

बाबा शिरडीसरोवरींचें कमळ । भक्त सेविती परिमळ ।
अभागी भेकांचे वांट्यास चिखल । सर्व काळ कालविती ॥ ११२ ॥
कोणा न सांगे आसन । प्राणापान वा इंद्रियदमन ।
मंत्र तंत्र वा यंत्र - भजन । फुंकणें कान तेंही ना ॥ ११३ ॥
लौकिकीं दिसली लोकाचारी । परी अंतरींची आणिक परी ।
अत्यंत दक्ष व्यवहारीं । न ये कुसरी दुजयातें ॥ ११४ ॥
भक्तार्थ धरिली आकार । तदर्थचि तयांचे विकार ।
हे संतांचे लौकिकाचार । आणा साचार सकळिक ॥ ११५ ॥
साई महाराज संतनिधान । केवळ शुद्ध परमानंद-स्थान ।
तयां माझें साष्टांग वंदन । निरभिमान - निर्लेप ॥ ११६ ॥

साईसच्चरित—अध्याय १० वा

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] जानेवारी १९७४ [ अंक ९

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४ टे. नं. ४४३३६१

# श्री साईलीला

मासिक महिन्याच्या पहिल्या तारखेला प्रसिद्ध होते.

या मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मतांची जबाबदारी त्या त्या लेखकांची राहील.

मासिकाकडे प्रसिद्धीसाठीं पाठवावयाचे साहित्य सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूवर लिहिलेले असावे.

साहित्याची स्वीकृति किंवा अस्वीकृति लेखकांना वा कवींना व्यक्तिगत पत्रानें कळविणें त्यांना आवश्यक वाटल्यास त्यासाठी २० पैशांची तिकिटें साहित्याबरोबर पाठवावींत. ज्या अंकांत साहित्य प्रसिद्ध झालेले असेल तो अंक संबंधित लेखकांकडे बुक पोस्टाने पाठविला जाईल.

वार्षिक वर्गणी ६ रु. पाठवितांना आपल्याला मासिक इंग्रजी पाहिजे कीं मराठी याचा स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे. तसा नसल्यास मराठीच अंक पाठविला जाईल.

सर्व अंक बुकपोस्टाने यादीप्रमाणे १ तारखेच्या सुमारास पोस्टांत टाकले जातात. त्यानुसार ५ तारखेपर्यंत तरी अंक सर्वांना मिळावे. अंक पोस्टांत गहाळ होतात व वाचकांना मिळत नाहीत अशा तक्रारी येतात, पण संस्थान या बाबतींत काही करूं शकत नाही. आपला अंक खात्रीशीर हवा असल्यास रजिस्टर्ड ए. डी. चे १ वर्षाचे पैसे आगाऊ आमच्याकडे भरावे म्हणजे अंक रजिस्टर्ड करून पाठवूं.

नमुना अंक मोफत पाठविणें शक्य नाही. तो ८५ पैशांची तिकिटें पाठवून माग-वावा. मागील महिन्यांचे अंक सामान्यतः शिल्लक नसतात. तरी त्याबद्दल पत्रव्यवहार करूं नये. लेखकांनीं आपल्या लेखांच्या वा कवितांच्या वर उजव्या बाजूस आपले पूर्ण नांव व पूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. लेखाची स्थळप्रत त्यांनी न चुकतां आपल्याजवळ ठेवावी. साहित्याचे संपादन करतांना त्यांतील आक्षेपार्ह वाटणारा मजकूर काढून टाकणें, किंवा भाषा सुधारून घेणें, वगैरे बाबतींत संपादक व त्यांनी नेमलेले तज्ज्ञ यांना पूर्ण व अंतिम अधिकार राहतील. लेख किंवा कविता स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्याचाही पूर्ण अधिकार त्यांना राहील.

या मासिकाच्या बाबतींत सर्व पत्रव्यवहार मुंबई कार्यालयाशींच करावा. शिरडी कार्यालयाकडे करूं नये.

संपादकीय

# विश्व हेंच कुटुंब

आज सारे जग शास्त्रीय प्रगतीमुळे बाह्यतः परिवर्तन पावत आहे. सारे जग निरनिराळ्या क्षेत्रात एका जिवंत ऐक्याने भारून जात आहे. **'वसुधैव कुटुम्बकम्'** म्हणजे ही पृथ्वी हेच आपले एक कुटुंब आहे अशी भावना हळू हळू जोर धरीत आहे. जागतिक ऐक्याची ही भावना माणसाला नव्याने प्रत्यक्ष आचरणात प्रतीत होत आहे. कोठूनही कोठे विमानाने माणूस अल्पशा काळांत जाऊ शकतो; जगात चाललेल्या सर्व कार्याची माहिती त्वरित संपर्क साधनांच्याद्वारा मिळवू शकतो. जगाच्या कोण-त्याही भागात युद्ध झाले तरी त्याचा सर्व देशांवर परिणाम होतो. सर्व देश जागतिक घटनांच्या बाबतीत जागरूक असतात. नुसती आपल्या राष्ट्रापुरती संकुचित भावना न ठेवता जागतिक प्रश्नांवर जागतिक दृष्टिकोन स्वीकारावा लागतो. मनुष्याच्या इतिहासात ही जी एकतेची नवीन पायरी गाठली जात आहे तिच्याविषयी प्रत्येक सुबुद्ध माणसाने आस्थेने पाहणे जरूर आहे. भेदांतून अभेदाकडे जाण्याचा जो धर्मप्रणीत मार्ग आहे त्याचे हे वैज्ञानिक बाह्य स्वरूप आहे. आरोग्य, वित्त, धान्य, व्यापार, न्याय, राजकीय, शांतता, कामगारवर्गाचे प्रश्न, संस्कृति, विज्ञान, कला, साहित्य, इत्यादि सर्व प्रश्न केवळ एका देशापुरतेच मर्यादित न राहतां त्यांचा विचार पुष्कळसा जागतिक पातळीवरून होत आहे. विज्ञानामुळेच नव्हे तर वाढत्या लोकसंख्येमुळेही सर्व प्रश्नांना करणात्मक व अकरणात्मक अशा दोन्ही दृष्टींनी जागतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. धर्म, संस्कृति, विद्या, वस्त्रे, व्यवहार, वित्तव्यय, आरोग्य इत्यादींच्या बाबतीत अनेक वंशांचे व भिन्न चालीरीतींचे लोक जाणतां वा अजाणतां एकत्र येत आहेत. येथून पुढे नवीन विचारमूल्ये उदयास येत जातील. आपणां सर्वांना ही नव्या आंतरराष्ट्रीय युगाचीं पावलें ओळखतां आली पाहिजेत. **"हे विश्वचि माझें घर"** असें वर्णन करणाऱ्या ज्ञानेश्वरांना, आज ग्रहमालिकेत संचार करणाऱ्या अवकाशयात्रिकांनी कृतीने भौतिक क्षेत्रांत प्रत्यक्ष आचरण करून दाखविले आहे. आपण भौतिकदृष्ट्या प्रगत होऊन परस्परांच्या जवळ येत आहोत. भावनिक दृष्ट्याही, तसेच एकीने जवळ येण्याची अत्यंत आवश्यकता आहे. नाहीतर प्रेमाऐवजी द्वेष, प्रगतीऐवजी परागति, ऐक्याऐवजी संघर्ष आणि कल्याणाऐवजी विनाश यांनाच तोंड द्यावयाची पाळी येईल, यासाठी आज भोवताली दिसत असलेल्या गोंधळातही मनुष्यमात्राच्या अंगभूत चांगुलपणावर आपली दृढ श्रद्धा पाहिजे.

# श्रीसाईसच्चरित्

## अध्याय १५ वा

(लेखक : श्री. द. शं. टिपणीस)

भागवत धर्मीयांना भागवत, वारकऱ्यांना ज्ञानेश्वरी व गाथा, समर्थ भक्तांना श्रीदासबोध जसा व जितका पवित्र व प्रिय आहे तसेच व तितकेच श्री साईसत्चरित्र साईभक्तांना पवित्र व प्रिय आहे. अशी ज्याची दृष्टी व अनुभव तशी त्याची आवड वास्तविक हे सर्व पवित्र ग्रंथ मुळांत एकच आहेत. कारण त्यांतील मूळगाभा (core) एकच आहे. परिस्थिती प्रमाणें ज्यांच्यासाठीं मुळांत ते निर्माण झाले त्यांना ते पेलतील असे रूप त्यांनी धारण केले. दुधानें दही व्हावे, दह्यानें ताक व्हावे, ताकाने लोणी व्हावे, व लोण्याने तूप व्हावे तसा हा प्रकार आहे, या सर्व ग्रंथांची राणी एकच व ती म्हणजे भगवद्गीता, भगवद्गीतेच्या भूमींत जन्मास आलेली ही रत्ने. भगवद्गीता ईशावास्यांतून निघाली तर ईशावास्य अथांग अशा वेदसागरांतून निघाले. हजारों पानांच्या वेदवृक्षाचें लहानसें अठरापानी तुळशीचे रोपटे म्हणजे ईशावास्य, लहान पण वडिलाच्या तोलामोलाचे. या तुळशीपासून वेचलेल्या मंजिऱ्या म्हणजे भगवद्गीता या मंजिऱ्यांचे भक्तांच्या गळयांत घालण्यासाठीं संतानीं केलेल्या माला म्हणजे आमचे वरील सर्व ग्रंथ सर्वमाला सारख्याच असे असता आम्ही मात्र आमची माळ मोठी व तुमची छोटी असे भेदाभेद करीत बसतो. हे आमचे अज्ञान आहे. साईभक्तांनीं तरी अशा अज्ञानाचा आपणांस स्पर्श होऊं देऊं नये. खुद्द साईबाबानी वरील सर्व ग्रंथांचाच नव्हे तर लोकमान्याच्या गीतारहस्याचाही आदर केला आहे हे साईचरित्राच्या वाचकांना माहीत आहेच. यास्तव जे खरे साईभक्त आहेत त्यांनी वरील-सर्व ग्रंथ आत्मसात करून श्रीसाईसच्चरित्रांतील अत्यंत सोप्या भाषेंतील वेदांतही आत्मसात् करण्याचा प्रयत्न करावा, हें त्यांचे पवित्र कर्तव्य आहे. अशाच कांहीं वेदांत-विषयक गोष्टींकडे लक्ष वेधावे म्हणून प्रयत्न करीत आहे.

श्री साईसच्चरित्रांतील अ. १५ व १९ हे महत्त्वाचे आहेत. त्यांत भगवद्गीता आहे, ईशावास्य आहे व वेदांत आहे. साईचरित्रांतील मोठया अध्यायांपैकीं १९ वा आहे. तो २५६ ओव्यांचा आहे, ५२ वा सोडल्यास सर्वांत लहान अध्याय १५ वा म्हणजे ११६ ओव्यांचा आहे, १९ व्या अध्यायांत श्री. दाभोळकरांना निमित्त करून बाबांनीं विद्वद्ज्जनांना ब्रह्मज्ञान थोडक्यांत सांगून तें साधण्यास कठीण वाटत असेल तर भक्ति-

मार्ग सुचवून निष्ठा व सबूरी यांचे अध्यात्मांतील महत्त्व विशद केले आहे. १५ व्या अध्यायांत 'ईशावास्यमिदं सर्वम्' हा भगवद्‌गीतेचा गाभा आपल्या वैशिष्टयपूर्ण शिक्षण पद्धतीने प्रचीती देऊन 'सर्व साधारण जनतेसाठीं अगदीं साध्या व सोप्या भाषेंत बाबानी उकलून दाखविला आहे. एवढेच नव्हे तर देवाची भक्ति म्हणजे नक्की कोणाची भक्ति करावयाची व कशी करावयाची हे ही त्यांनीं त्यांत स्पष्ट केले आहे. हें विश्वचि माझे घर असा नुसता संकल्प केल्याने कांहीं हे विश्व आपले घर होऊं शकत नाहीं. हे विश्वचि माझे घर हा कांहीं जप नव्हे कीं इतके कोटी झाला कीं तुम्ही दुसऱ्याच्या घरांत खुशाल शिरूं शकाल ! दुसऱ्याच्या हृदयाला घरें करणें एक वेळ सोपें असेल पण दुसऱ्याच्या हृदयांत घर करणें वाटतें तितकें सोपें नाहीं वडीलधाऱ्या माणसांपेक्षां अगदीं लहान मुलांना हे विश्व निराळे दिसते व भासते. कसें याची कल्पना आपणांस कधीं येणें शक्य नाहीं कारण आपण आपले बालपण पूर्णपणे विसरलों आहोत. संतानांही हें विश्व पण बालकांपेक्षां निराळें दिसतें व भासतें. तें कसें हें संतच जाणू शके. तुम्हां आम्हाला कळणें शक्य नाहीं, निळया काचेंतून हे विश्व कसें दिसतें हे काय शब्दांनीं सांगून समजेल कीं निळया काचेतून पाहिल्यानें समजेल ? तद्वत हे विश्वचि माझे घर तेव्हांच होईल की जेव्हां एक विशिष्ट दृष्टि जी संतांना प्राप्त झालेली असते, ती आपणांस प्राप्त होईल. ही दृष्टि कशी कमवावी याचे मार्गदर्शन बाबानीं या अध्यायांत केले आहे. म्हणून १५ वा मला मोलाचा वाटतो. यास्तव त्याचा थोडा विस्तार करतो.

या अध्यायांत चोळकरांना प्रचीती देऊन बाबांनीं त्यांचे कसे कल्याण केले हे सांगणारा एक लहानसा कथा भाग आहे, चोळकर ठाण्याचे रहिवाशी असावेत असे वाटते. परिस्थिति गरिबीची, कचेरीत–बहुधा सरकारी असावी–कारकुनाची नोकरी तीहीं कायमची नव्हे, कायम होण्यासाठीं खात्याची परीक्षा departmental examination पास व्हावीलागे. चोळकर त्या परीक्षेस बसले होते. पास झाले तर ठीक, नाहीतर भाकरीला मुकण्याची पाळी. कुटुंबाचा भार त्यांच्यावर होता. चोळकर काळजीत होते. त्याच सुमारास संत दासगणूंचे कीर्तन ठाणें येथें झाले. चोळकर कीर्तनास हजर होते. दासगणूंनी आपल्या रसाळ वाणीने साईबाबांची महती वर्णन केली. ती ऐकून चोळकर हेलावले व मनोमय त्यांना वाटू लागले कीं आपल्याला आजच्या परिस्थितींत हात देतील तर ते हेच बाबा. बाबांच्या प्रतिमेला हात जोडून मनांत त्यांनीं प्रार्थना केली कीं बाबा, कायमची भाकरी गरिबाच्या पदरांत टाका. त्यासाठीं परीक्षा पास व्हावयला पाहिजे. गरिबाचे तुम्ही वाली ही महती ऐकली व तुमच्या पायी शरण आलो आहे. अनेकांचे पाहून चोळकराना माहीत झाले होते कीं इच्छित साध्य होण्यासाठीं देवाला प्रसन्न करावे लागते व त्यासाठीं नवस करावा लागतो. पण चोळकरांना काय माहीत कीं हा देव माणसानें केलेला नसून तो स्वयंभू आहे. त्याला कोणत्याही आमिषाची जरूरी नाहीं, त्याला पाहिजे ते दिले कीं तो तुम्ही त्याच्याकडे

जाण्याआधीच तुमच्या घरीं येऊन हजर होतो. भक्ताच्या भावनेला मान देण्यासाठीं तो सगळे सोहळे करवून घेईल हो पण त्याचे लक्ष सोहळ्याकडे नसते तर समोरच्या भक्ताच्या अंतःकरणाकडे असते. आतां चोळकर गरीब, ते नवस तो काय करणार ? श्रीमंतांचे नवस श्रीमंती, मोठमोठ्या पूजा, सहस्त्रब्राह्मण भोजन, गोदान वगैरे, जेवढा नवस मोठा तेवढा देव अधिक खूष पण पुष्कळ वेळां जेवढा नवस मोठा तेवढा आतला व्यवहार खोटा; देवापेक्षां स्वतःच्या वैभवाचे प्रदर्शन त्यात अधिक असते. मी इतरा पेक्षा निराळा कसा आहे पहा ! ,, ही भावना असते. पण चोळकरांनीं कोणता नवस केला ? गरीब माणूस ! करून असं काय करणार ? हेच बाबा आपले इच्छित साध्य करून देतील या पूर्ण विश्वासाने व निष्ठेने चोळकर म्हणाले की बाबा, परीक्षा पास होऊन नोकरी कायम झाली तर शिर्डीला येऊन आपल्या नांवाने खडीसाखर वाटीन. आणि काय आश्चर्य ! चोळकरांच्या खडीसाखरेच्या चार खडयांवर प्रसन्न होऊन बाबांनी चोळकराचे इच्छित पूर्ण केले व नवस म्हणजे काही तरी मोठे या समजाला धक्का दिला. नवसाच्या रूपापेक्षां नवसाच्या मागे असलेली निष्ठा देवाला पाहिजे असते. चोळकर म्हणाले ते निष्ठेने तळमळीने. बाबाना हाक मारली ती आर्ततेने. ही आर्तता अध्यात्मात फार महत्त्वाची आहे. भक्त आर्त झाल्याखेरीज देव त्याला भेटत नाही. जळाबाहेर असलेल्या माशाची जशी तडफड तळमळ होते तशी तडफड व तळमळ भक्ताच्या मनाची होईल तेव्हां देव प्रसन्न होऊन पुढें उभा राहील. श्री रामकृष्ण परमहंस मातेच्या भेटीसाठी किती आतूर झाले होते, कसे तळमळत होते ; कबीराला राम भेटीची कशी ओढ लागली होती ; ज्ञानेश्वरादि संतांनी लिहिलेल्या विरहिणीतून विठ्ठलाच्या भेटीची आपली आतुरता कशी व्यक्त केली आहे हे सर्व लक्षात घेतल्यास देवाला आपणांपासून खरोखर काय पाहिजे हें ध्यानांत येईल, अशा तळमळीनें नवस केला तर दिसायला क्षुल्लक असला तरी देव पावतो. दुसऱ्याने केले म्हणून आपण केले असे मात्र यात असू नये. लहान मुले पास होण्यासाठीं मारुतीला खडीसाखर कबूल करतात हा अपवाद सोडल्यास चोळकरांखेरीज दुसऱ्या कोणी असा केवळ खडीसाखरेचा नवस सहसा केला नसेल. याच ग्रंथांत दामु अण्णांनी मोठमोठे नवस केल्याचा उल्लेख आहे. पण त्यांच्या नवसास बाबांनीं दाद दिली नाहीं, भक्त जे मागतात त्याची त्यांना खरोखरच जरूरी आहे कीं नाहीं व त्यात त्यांचे कल्याण आहे कीं नाहीं हे बाबा प्रथम पहातात. चोळकराना भाकरीची जरूरी होती. दामुअण्णांना लाखाची जरूरी नव्हती. म्हणून बाबांनी त्यांच्याकडे लक्ष दिले नाहीं. नवस लहान की मोठा याला महत्व नाहीं तर त्याच्या मागे असलेली तळमळ, ओढ, निष्ठा हीं महत्वाची आहेत, पुन्हां नवस करणें हे एक प्रकारे वचन देणे आहे. ते आपण पूर्ण पाळले पाहिजे, हे लक्षांत घेऊन पेलेल असाच नवस करावा, नाहींतर सोन्याची पुतळी वाहीन असे म्हणणाऱ्या त्या गरीब म्हातारीने आपल्या सोन्या नावाच्या मुलाच्या गळयांतील तांब्याची पुतळी वाहिली अशी

हास्यापद स्थिति होईल, हे देवाला फसवणे आहे. ते कदापि घडू नये. भक्ति कोणत्याही दैवताची करा. ती तुमची आवड. पण आपल्या दैवतावर पूर्ण निष्ठा ठेवा. निष्ठा अध्यात्मांत अति महत्वाची आहे, नुसत्या निष्ठेच्या जोरावर देव जिंकता येतो. निष्ठेचे महत्व बाबानी १९ व्या अध्यायांत सांगितले आहे. निष्ठा कशी असावी व कशी असूनये हे आपण पाहू या, कारण निष्ठे शिवाय भक्ति नाहीं.

निष्ठा ही उत्तम डिंकासारखी असावी अगदीं स्टिक फास्ट, एकदां चिकटला कीं सुटता सुटायचा नाहीं, कागद फाटेल पण डिंक निघायचा नाहीं. निष्ठा देण्यापूर्वी शंभरदां विचार करावा पण एकदां दिली की कायमची चिकटून बसली पाहिजे. मेणबत्तीच्या वितळलेल्या मेणासारखी निष्ठा नसावी. गरम आहे तोंवर मेण चिकटून बसते. पण थंड झाले की पोपडा निघून येतो, अशी निष्ठा असूं नये. कोर्टांत खटला चालतो. अशील स्वतःच्या फायद्यासाठीं वकील देतो. कोर्टांत तो गप्प बसतो. त्याने सर्व विश्वास वकीलावर टाकलेला असतो. वकील बोलतो, प्रश्न करतो, अशीलाच्या वतीने सर्व कांहीं करतो, अशील कांहीं वकीलाला कोर्टात असं बोला, तसं विचारा असे कांहीं सांगत नाहीं. कारण त्यानें आपल्या वकीलावर पूर्ण विश्वास टाकलेला असतो, तो फक्त निकालाची वाट पहात बसतो. असा भरवसा असा विश्वास, आपला-बाबांच्यावर वा जे कोणते आपले दैवत असेल त्यावर असला पाहिजे. चोळकरानी नवस केला व बाबा करतीलच असा भरंवसा ठेवला व त्याना बाबा पावले. संकट निवारण्यासाठीं आपण नवस करून बाबांना आपल्या तर्फे वकील केलेले असते. नवस म्हणजे जणू काहीं आपल्यातर्फे आपण देवाला दिलेले वकील पत्रच आहे, निष्ठेच्या मोबदल्यात बाबा आपली केस जरूर घेतील. ती त्यांनीं तशी घेतली कीं काय करायचे ते बाबा करतील असा पूर्ण भरंवसा ठेवावा. बाबा प्रेरणा देतील तसा मानवी प्रयत्न आपण चालू ठेवावा व स्वस्थ चित्त रहावें. "माझा देवावर पूर्ण भरंवसा आहे. तो करील सर्व कांहीं, मी काळजी करीत नाहीं ;" असे पुष्कळ बोलले जाते. पण कुठ-पर्यंत? सर्व ठीक चाललय तों पर्यंत, जरा कांहीं बिघाड झाला की वाऱ्याने पाचोळा उडून जावा तसा हा विश्वास कुठल्याकुठे उडून जातो व देव आहे की नाही येथ पर्यंत मनाची धाव जाते. अशी निष्ठा असूं नये, चोळकरासंबंधीं येथ पर्यंत जो कथा भाग झाला त्यावरून घेण्यासारखे असेल तर हें. पण बाबाना चोळकराना अति महत्वाचे सांगावयाचे आहे ते पुढील कथा भागात आहे.

पुढील कथा भागात सर्व धर्म ज्यात सामावून घेता येतील असा मुख्य गाभा की ज्यावर अध्यात्म व सदाचार आधारले आहेत तो सांगितला आहे. ही गोष्ट तिचे महत्व लक्षांत घेऊन बाबांनीं इतर अध्यायांतून ही सांगितली आहे. उदाहरणार्थ २० व्या अध्यायात हेच तत्व विशेष घटना घडवून दासगणूना सांगितले आहे. व त्यात "**तेन त्यक्तेन भुंजी थाः**"याचाही अर्थ स्पष्ट केला आहे. १५ व्या अध्यायांत धर्माचा मुख्य गाभा

बाबांनी प्रथम चोळकराना प्रचीती देऊन मग अगदीं साध्या भाषेंत तो सांगितला आहे कसा तो पहा. चोळकर पास झाले. त्यांची नोकरी कायम झाली. आनंद वाटला त्यांना. पण केलेला नवस फेडला पाहिजे.वचन बद्ध होते ते. नवस करणे सोपे असते पण तो फेडताना पुष्कळ वेळां कठीण जाते. काहींना काहीं अडचणी येऊन नवस फेड लांबणीवर पडते व कालांतरानें त्याचा विसर पडतो. अशा वेळीं काय करावे? चोळकरांनी काय केले? आठवण रहावी म्हणून शिर्डीला जाऊन नवस फेडला नाहीं तोंपर्यंत साखर वर्ज्य, चहा घ्यायचा तो बिनसाखरेचा. चोळकरांची नवस करण्या पासून तों बिन-साखरेचा चहा घेण्यापर्यंतची सर्व मनस्थिति, कशी कोण जाणे, बाबाना संपूर्ण कळली होती. कशी याचा पूर्ण खुलासा बाबानी चोळकर शिर्डीस त्यांच्या दर्शनास गेल्यावर केला आहे व तीच अति महत्वाची गोष्ट या अध्यायात आहे. प्रचीती शिवाय विश्वास व निष्ठा बसत नाहीं हे बाबा पूर्ण जाणून होते. म्हणून प्रथम चोळकराना प्रचीती देऊन नंतर भक्तांना नेहमीच जे गूढ वाटते त्याचा खुलासा त्यांनीं स्वतःच केला. मोठ्यात मोठे गहन तत्त्व प्रचीती देऊन वा एकादी घटना घडवून सहज बोलताना भक्तांच्या ध्यानांत आणून देण्याची बाबांची हातोटी पहा. कांहीं दिवसानंतर चोळकर शिर्डीस गेले. श्री. जोगांच्याकडे ते उतरले होते. जोगाना घेऊन ते मशिदीत बाबांच्या दर्शनास गेले, नवस फेडून त्यांनी बाबांच्या चरणावर डोके ठेवले नाहीं तोंच बाबा जोगाना म्हणाले, अरे, याला घेऊन घरीं जा व भरपूर साखर असलेले चहाचे पेले पाज. जोगाना अर्थात याचा कांहीं उमज पडला नाहीं. पण नेहमीच्या सरावाने ते समजले की बाबांनी चोळ-करांना त्यांच्या मनाची खूण पटवली, आणि चोळकर ! ते तर गहिवरून गेले होते, आपल्या मनची गोष्ट बाबाना समजली, केवढे हें बाबांचे सामर्थ्य ! त्यांच्या डोळयांतून आनंदाश्रू वाहू लागले. बाबांचे सामर्थ्य पाहून ते इतके विस्मित झाले की हें कसें समजले हे विचारण्याचे वा याचा पुसट विचार करण्याचे त्यांना भान राहिले नाहीं पण बाबा ? त्यांनी चोळकराना फार वेळ गोंधळात ठेवले नाहीं. चोळकराच्या निमित्ताने सर्व भक्तांना त्यांना उपदेश करावयाचा होता. भक्तांच्या मनात कुतूहल उत्पन्न व्हावे, पुढे जो उपदेश करावयाचा त्याबद्दल भक्तांना विश्वास वाटावा व त्याचा त्यांच्या मनावर ठसा उमटावा म्हणून बाबा येथवर मोघम मोघम बोलले. पण पुढे बाबानीं 'हे कसे कळते' या भक्तांच्या मनात येणाऱ्या शंकेचे निरसन करून एक महान तत्त्व सहजा सहजी समजावून दिले.

बाबानी खुलासा केला की चोळकरा, तू साखर सोडलीस तुझ्या मनांतील गोष्ट मला कळली, कारण मी तुझ्या घरातच होतो व आहेही. पण हे तुम्हाला माहीत नाहीं. म्हणून मला अशा गोष्टी कळतात कशा याचे तुम्हास आश्चर्य वाटते, पण आश्चर्य नाहीं की चमत्कार नाहीं एकाद्या खोलींत दोन माणसे बोलत असली व तुम्ही तिथं असलात तर त्यांचे बोलणे तुम्हाला कळणार व त्यांचे बोलणे तुम्ही तिऱ्हाईताला

सांगितले तर त्यांत काही आश्चर्य वाटत नाही कीं चमत्कार आहे असे कोणी समजत नाहीं. ही गोष्ट समजण्यास जितकी सरळ व सोपी आहे तितकीच मला तुमच्या इत्थंभूत गोष्टी माहीत होतात हे सोपे सरळ आहे. मी तुमच्या हृदयातच सदैव असतो. मी केवळ शिर्डी निवासी नाहीं तर हृदय निवासी आहे. तुम्हाला जाणीव नाहीं की तुमचा 'एक' तुमच्या घरांतच गुप्त होऊन बसलेला आहे, मग आतां सांगा की तुमच्या मनांत चित्तात उठणारे विचार, विकार, वासना वा इतर भावना वगैरे जे जे कांहीं तरंग उठतील ते त्या हृदयस्थाला मला कळतात यांत आश्चर्य करण्यासारखे काय आहे? मी तुमचा हृदयस्थच आहे असे नव्हे तर मी तुमच्या शरीरांतील कणाला रक्ता-मांसाला व्यापून राहिलो आहे. पण तुमचा समज कीं साईबाबा शिर्डीला आहेत. या देहाला तुम्ही साईबाबा समजतां, पण खरे हे की हा देह साईबाबा नव्हे तर साईबाबांचा हा देह कार्य करण्याचे साधन आहे, एवढेच. साई शिर्डीला आहे हे खरे पण संपूर्ण सत्य म्हणजे साई परमेश्वर वा विश्वशक्ति सर्व चराचरांत भरून राहिलेली आहे. तुम्ही कोठेही गेलात तरी तुमचे हृदय तुमच्या बरोबर येणारच. अर्थात हृदयस्थही येणारच. तुम्ही कुठे कांहींही अगदीं गुप्त रीतीने ठरविलेत वा केलेत तर ते मला सहाजिकच माहीत होते. शिर्डीला आल्यावर माझी म्हणजे या देहाची पूजा करता, माझ्या पायांवर मस्तक ठेवून शरण येता, हे ठीक आहे. ती सगुण भक्ति आहे व ती सुरवातीला जरूर आहे. पण सगुण भक्तीकडून निर्गुण भक्तीकडे जाण्याचा प्रयत्न तुम्ही केला पाहिजे. सगुण भक्तीचा पांगुळगाडा निर्गुण भक्तीची चाल शिकवण्यासाठी आहे, म्हणून शिर्डीला आल्यावर मला वा इतरत्र माझ्या प्रतिमेला नमस्कार करताना तो मी बाबा या देहाला करीत नसून त्या देहांत असलेल्या हृदयस्थाला विश्वशक्तीला परमेश्वराला करीत आहे अशी भावना आपल्या ठिकाणी निर्माण करण्याचा प्रयत्न करा, मी सर्व हृदयस्थ आहे हे ओळखून तुम्हांला जो जो भेटेल त्यांतील हृदयस्थ पहाण्याचा प्रयत्न करा, अशी दृष्टी तुम्हांस प्राप्त झाली कीं मग सर्वं खल्विदं ब्रह्म हे तुम्हांस दिसूं लागेल व "विश्वचि माझे घर" हे तुम्हांस भासू लागेल. ही गोष्ट आचरणात आणण्यास फार कठीण आहे. कारण तुमचा हृदयस्थ नाना वासना, विकार व अहंकार यांनीं झाकलेला आहे. झाडझूड करून चित्त साफ करा म्हणजे तुमचा हृदयस्थ तेजाने तळपू लागेल. चित्ताच्या आरशावरचा मळ साफ करा मग त्यांत डोकावा की तुमचा हृदयस्थ तुम्हास दिसेल. १५ व्या अध्यायांतील महत्वाचा भाग तो हा.

याच अध्यायांत शेवटी पाली संबंधी एक चुटका आहे. त्यांत बाबांनी चोळकरांना जे दर्शविले तेच आहे. पुन्हा तेच सांगण्याचे कारण काय ? मुंबई कडील मराठी भाषा व घाटावर चालणारी मराठी भाषा यांत थोडी फार तफावत आहे. चोळकरांना जे सांगितले तें सुशिक्षित भक्तांना कळू शकेल. पण ग्रामीण भागातील भोळ्या भाबड्या

भक्तांचे काय ? बाबांना सर्वांची काळजी. म्हणून भोळ्या भावड्या भक्तीला (अवडंबरा पेक्षां ही भक्ती बाबांना फार प्रिय होती. गंध्याची घटना पहा.) पटेल अशाप्रकारे पालीचा उपयोग करून गंमत वाटेल अशा भाषेंत पुन्हां ग्रामीण भक्तांना बाबांनी सांगितले. पाल चुकचुकते कारण तिची बहीण तिला भेटायला येत आहे म्हणून तिला आनंद झाला आहे. ऐकणाऱ्यांना बाबा हे काही तरी गमतीने विनोदाने म्हणाले असे वाटले. पण केवळ विनोद करायला बाबाना वेळ नव्हता. थोड्या कालावधीत त्याना महान कार्याची मानवतेची मुहूर्त मेढ पक्की रोवावयाची होती. अधून मधून बाबा विनोद करीत हे खरें पण त्या मागे काहीना काही बोध असे. पालीच्या उदाहरणांत चोळकरांना जे सांगितले तेच बाबाना सांगायचे होते पण कांहीं तरी अधिक होते असे मला वाटते. पाली सारखा क्षुल्लक प्राणी तिला बहीण भाऊ हे कसे असू शकतील असे आपणास वाटते. पण अगदी साधा विचार करा. म्हणजे बाबांनी विनोदाच्या वेष्टनात मानवाचे काही समज कसे चुकीचे असतात हे कसे दर्शविले आहे ते लक्षांत येईल. जो प्राणी जन्मास आला मग तो मोठा छोटा माणूस मुंगी कोणीही असो, त्याला आईही असणारच. (काही अपवाद सोडून) आई आली की वडील आलेच. भाऊ बहिणी व इतर नाती तयार झालीच. मानवाला बुद्धि असल्यामुळे तिच्या मदतीने मानवाने आपल्या नात्यागोत्यांचे संबंध कर्तव्याच्या धाग्यांनी घट्ट करून आपला एक भक्कम समाज निर्माण केला आहे. मानवाला भाषा अवगत असल्यामुळें तो नातीगोती जाणू शकतो. प्राण्यांना मानवा इतकी बुद्धि व भाषा अवगत नसल्याने नात्याचा अर्थ व संबंध तो जाणू शकत नाहीं. नव्हे असल्या कांहीं गोष्टी अस्तित्वात आहेत हे त्याच्या डोक्यातही येत नाहीं. पालीच्या घटनेत मुख्य तत्त्वाखेरीज मला अधिक काही भासले तें हें.

मी हृदयस्थ आहे याचे तात्त्विक विवेचन १५ अध्यायांत झाले. पण याचा सर्वसाधारण जनतेला काय उपयोग ? त्यांना जें पाहिजे ते नित्याच्या व्यवहारांत उपयोगी पडेल व सहज करता येईल असे काही हृदयस्थ दिसणार कसा ? त्याची जाणीव होणार कशी ? काय केलें कसे वागले की हृदयस्थ भेटेल ? सामान्य जनतेला हे प्रश्न महत्वाचे आहेत. बाबा हे जाणून होते. शिवाय तत्त्व व्यवहारांत उतरले तर धर्म पूर्ण होतो हे ही त्यांना माहीत होते बाबा साक्षात्कारी असले तरी व्यवहारी होते. म्हणून मुख्य सिद्धांत साधण्यासाठीं व्यवहारात काय केले पाहिजे कसे वागले पाहिजे हे बाबानी अनेक वेळां अनेक ठिकाणी सांगितले आहे. धर्माचरणाने धर्म जीवंत राहतो. म्हणून धर्माचरणावर बाबांनी फार भर दिला आहे. हा विषय १५ व्या अध्यायात येत नसल्यामुळे त्याचे विवेचन येथे करणे अप्रस्तुत होईल. पण न केले तर येथपर्यंत केलेल्या विवेचनांत अपूर्णता राहील. यास्तव मुख्य सिद्धांतास धरून बाबांनी मानवी व्यवहाराबद्दल जे मार्गदर्शन केले आहे त्याची अगदी थोडक्यात टिपणी करून हा लेख संपवू.

हृदयस्थाची ओळख होण्यासाठी, 'सर्वं खल्विद ब्रह्म' याचा अनुभव येण्यासाठीं अध्यात्मांत अनेक मार्ग आहेत. त्या सर्वांत भक्तिमार्ग अधिक सुकर व सोईस्कर असल्यामुळे बाबानी भक्तिमार्गाचा उपदेश आपल्या भक्तांना केला आहे. आणि त्यातही नामस्मरणाची महती विशेष गाइली आहे. अध्यात्मामध्यें चित्तशुद्धाला फार महत्व आहे. चित्तशुद्धि झाल्या खेरीज कोणतीही अध्यात्मिक प्रगती होऊं शकत नाहीं. चित्त शुद्धीचे जे काही मार्ग आहेत त्यांतील बरेच ससासारखे म्हणजे चपलतेने ध्येयाकडे नेणारे पण जरा अवधान सुटले तर ससाप्रमाणें स्वतःची फसवणूक करणारे आहेत. पण नामस्मरण हा मार्ग मंदगतीने चालणाऱ्या कासवा प्रमाणे निश्चित यश देणारा (Slow but sure) आहे. त्यात भक्ताची फसवणूक होण्याचा वा अहंकाराकडून चकविला जाण्याचा यत्किंचितही संभव नाहीं. बिनखर्चाचा व स्थल कालाची मर्यादा नसलेला असा हा मार्ग आहे. जाती धर्म पंथ वर्णादि कोणतेही भेद याच्या आड येत नाहीत. म्हणून बाबानी नामस्मरणाची कास शेवट पर्यंत न सोडण्याबद्दल आपल्या भक्ताना सांगितले आहे. कारखान्यातील मुख्य यंत्र चालू झाले की पट्टयाने त्याच्याशी निगडित असलेली सर्व यंत्रे आपली कामे व्यवस्थित करूं लागतात; तद्वत निष्ठेने नामस्मरणाचा पट्टा चालू झाला की आत्मशुद्धीची अंतर्गत सर्व यंत्रणा काम करू लागते व हळू हळू चित्त-शुद्धी होत राहते. यास्तव मुख्य सिद्धांताची जाणीव होण्यासाठीं आपल्या भक्तांनी नामस्मरणाचा मार्ग निष्ठेने अनुसरावा असे बाबाचे आग्रहाचे सांगणे आहे. मुख्य सिद्धांतातून अनेक उपसिद्धांता निघतात त्यांचे पालन करण्याबद्दल बाबानी वेळो-वेळी अति तळमळीने सांगितले आहे. त्याची थोडक्यात टिप्पणी अशी. (१) मानवाने एकमेकाशी विनयाने व नम्रतेने व्यवहार करावेत. (२) कोणास कठोर वा लागट बोलू नये. (३) कोणाचा द्वेष वा मत्सर करू नये. (४) सर्व प्राणिमात्र एकाचीच रुपें आहेत म्हणून कोणासही हिडीस फिडीस करू नये. (५) सर्व पशुपक्ष्यांना आपल्या प्रमाणेच तहान भूक आहे हे समजून शक्य होईल तेव्हां जमेल तितका त्यांची भूक तहान भागविण्याचा प्रयत्न करावा ही खरी हृदयस्थाची पूजा आहे. पूजेची ही संधी कधीही दवडू नये. माणसे देवाच्या आश्रयाने राहू इच्छितात. अनेक पशुपक्ष्यांनाही माणसाच्या आधाराची अपेक्षा असते. माणूस हा पशुपक्ष्यांचा देवच आहे. कारण तो त्यांच्या पेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे. यांखेरीज आणखीही उपसिद्धांत आहेत. ते आपण आपल्या रोजच्या जीवनांत उतरविण्याचा प्रयत्न करावा असे बाबांनी आग्रहाने पुन्हां पुन्हां सांगितले आहे.


१५ वा अध्याय वाचताना मला जे काही भासले ते व्यक्त करण्याचा येथपर्यंत प्रयत्न केला आहे. तें तसेच आहे असा हट्ट नाहीं, साईसच्चरित्र वाचताना, त्याचे पारायण करताना दरखेपेस काहीना काही ज्ञानकण मिळविण्याकडे सतत लक्ष द्यावे हे माझे मत कोणास पटल्यास साईभक्तांनी तसा प्रयत्न करावा ही विनंती.

———:०:———

# बाबा रामदास - चरित्र व वचनें

## अल्प चरित्र

प्रेषक : श्री. भा. म. घारपुरे, बी. ए. (ऑ.)
६, दुसरा मजला, रामदास को० ऑ. सोसायटी, राममारुती क्रॉस रोड, घंटाळी



**बाबा रामदास**

भारत प्राचीन काळापासून आजपावेतो संतांच्या परंपरेबद्दल विश्वविख्यात आहे. भारतातील अनेक सत्पुरुष जगन्मान्य झाले व त्यांच्या शिकवणुकीचा प्रभाव तत्कालीन समाजावर पडला, इतकेच नव्हे तर पिढयान पिढ्या त्यांचे उपदेश लोकांना उद्बोधक ठरले. परंतु प्रसिद्धीच्या झोतांत न सापडतां अत्यंत शांतपणे व सततपणे आध्यात्मिक कार्य करणारे असेही कित्येक सत्पुरुष भारतात निपजले आहेत की ज्यांनी आपल्या पावन संगतीचा लाभ अनेकांना दिला आहे, लोकांना सन्मार्गाला लावण्याचे कार्य केले आहे; अज्ञानी अशिक्षित लोकांच्या सहवासांत राहून त्यांच्या-

पैकीच आपण एक आहोत असे जीवन बाह्यतः जगून, आपल्यापरीने भारतांतील ह्या आध्यात्मिक ज्ञानाचा यज्ञ चालू ठेवला आहे. अशाच लोकोत्तर पुरुषांपैकी इगतपुरी तालुक्यातील बाबा रामदास हे एक होते.

**पंजाबांत जन्म**

पंजाब आणि हरियाना यांच्या सीमेवर असलेल्या एका खेड्यांत बाबांचा जन्म झाला. वयाच्या केवळ आठव्या वर्षी, एका महापुरुषाशी झालेल्या लहानशा संवादाचा परिणाम होऊन त्यानी गृहत्याग केला. गुरुदेव प. पू. शिवदासजी यांच्या आज्ञेनुसार भारत भ्रमण करतां करतां बीरवाडी जि. ठाणे, येथे ते चारपांच वर्षे राहिले व नंतर शेनवड, तालुका इगतपुरी, येथे एक स्थान पसंत करून तेथे वास्तव्य करून राहिले. काही दिवसानी तेथून पुनश्च ते निघून गेले, व जवळजवळ २१ वर्षानी परत आले. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात नंतर, आदिवासी भागात त्यानी सुमारे ४५ वर्षे राहून दलितसेवेचे अव्याहत कार्य केले. बाबांची रहाण्याची एक लहानशी झोपडी होती. त्या परिसराला ते आश्रम असे म्हणत त्यांचा पोषाख म्हणजे एक पांढरा स्वच्छ कुडता व धोतर. हेच कपडे कां या विषयी ते एक हकीकत सांगत असत.

"पू. गुरुदेव शिवदास समाधिस्थ होणार तत्पूर्वी आम्हां चारही शिष्यांना त्यांनीं त्यांचे पुढील कार्याबद्दल आज्ञा दिल्या. माझा (बाबांचा) क्रम आला त्यावेळी आम्ही सर्व तरणे बांड होतो. जटाजूट, कमंडलू, रुद्राक्ष, व कौपीन अशा साधूंच्या पेशातच असायचे. गुरुदेवांनीं आज्ञा देताच मी घुटमळलो. त्यांना म्हणालो— "गुरुदेव, आपणाबरोबर गृहत्याग करून निघालो तो भारतात सांप्रत असलेल्या लक्षावधी भिकाऱ्यांपैकी एक होण्यासाठीं नाही. ह्या प्राचीन परंपरेच्या महान देशात जिकडे तिकडे धार्मिक वृत्तीचे व भाविक जन आढळतात. माझ्या गणवेषाला पाहून कोणीही अर्धी चतकोर भाकर वेळेला देईल." पूज्य शिवदासजीनी माझ्या म्हणण्याचा आशय समजून तत्काळ मला माझा साधुवेष गंगामाईला समर्पण करण्यास सांगितले व एक पांढरा स्वच्छ कुडता व धोतर देऊन आशीर्वाद दिला."

पू. बाबा रामदास सुविद्य व बहुश्रुत होते. व्यावहारिक जगांतल्या मर्यादा सांभाळून आध्यात्मिकता आत्मसात करावी असा त्यांचा उपदेश असे. आध्यात्मिकता किंवा व्यावहारिकता यांचा अतिरेक उभयपक्षी कुपथ्यकारक कसा होतो हे ते पटवून देत.

**दिनक्रम :**

बाबांचा दिनक्रम म्हणजे सकाळी ९ ते १२ पर्यंत त्यांच्याकडे आलेल्या अनेक आर्त, दुःखी व व्याधिपीडितांची सेवा व शुश्रूषा ! त्या अगोदर ते पहाटेच ७-८ मैलांची पायी रपेट करीत. मध्ये काही काळ काही लोकांनी त्यांच्या मार्गावर काटेकुटे पसरवून ठेवणे, त्यांच्या पिण्याच्या पाण्यांत घाण वस्तु टाकणे असा उपद्रव दिला होता. त्यावेळी

त्यांनी असे लिहिले होते---अशा मानवी उपद्रवांपासून मला काहीच त्रास होणार नाही. त्याकडे दुर्लक्ष करा. बाबा दुपारी थोडीशी विश्रांति घेतल्यावर पुन्हा सायंकाळी ४ ते ६ पीडितांची सेवा शुश्रूषा करीत. सायंकाळी ६ नंतर मात्र ते एकटेच रहात. त्यांच्या आश्रमात मग कोणीही जात नसे.

दि. १४-५-१९६७ रोजी त्यांनी आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त 'भंडारा' आयोजित केला व त्याच दिवशी आपण निजधामास जाणार आहोत; बद्रीनारायण यात्रेस जाणार आहोत असे सांगितले. वैशाख शुद्ध द्वादशीस ते समाधिस्थ झाले. प्रतिवर्षी त्यांच्या स्थानावर पुण्यतिथीच्या उत्सवानिमित्त नामसप्ताह व महाप्रसाद होतो.

"बाबा रामदास यानी कोणालाही आपला शिष्य केले नाही."

[अप्रसिद्ध अशा लोकोत्तर लोकसेवक संतांपैकीं बाबा रामदास हे एक होते. श्रीसाईनाथ महाराजांच्या प्रमाणेच ते गरिबांची व पीडितांची सेवा करण्यास प्राधान्य देत.

**"जे कां रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले,**
**तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा !**

या प्रमाणेच त्यांचे आचरण असल्यामुळे त्यांचे विचारही साईलीला मासिकाच्या वाचकांना उद्‌बोधक वाटतील. बाबांचे एक भक्त श्री. घारपुरे यांच्याजवळील अजून अप्रकाशित असलेल्या, बाबा रामदास यांनी लिहून ठेवलेल्या महत्वाच्या विचारांना आपल्या मासिकांत प्रसिद्धी देण्यात येत आहे. त्यांच्या काही आठवणी श्री. घारपुरे यांच्याकडे पाठविल्या तर आठवणींचा संग्रह तयार करण्यास त्यांना मदत होईल असे ते कळवितात. ---संपादक]

## बाबा रामदास यांची
## विचारमौक्तिकें

सेवेच्या बदल्यात फळाची अपेक्षा ठेवू नये, प्रत्येक क्षण सेवेला योग्य असतो.

सेवाधर्माचा स्वीकार करणे हाच सर्वोत्तम आनंद आहे. कष्ट सहन करणाऱ्यापेक्षा कष्ट देणाऱ्याला जास्त दुःख सहन करावे लागते.

दुसऱ्यात सेवा करण्याची अधिक पात्रता आहे हे पाहून ईर्षा करू नका, जगात जेवढे म्हणून आश्रयाला पात्र मानव आहेत तेवढे सेवेला योग्य आहेत.

ज्या मनुष्याच्या हृदयाला खऱ्या प्रेमाचा अनुभव येत नाही तो खरी सेवा करू शकत नाही.

ज्या सेवेमुळे तुम्हाला कर्तव्य-विन्मुख व्हावे लागते ती खरी सेवाच नाही.

सेवेचा सुगंध शांतीच्या रूपाने परत मिळत असतो.

कृतज्ञता—महान् सद्गुण——धर्मः कृतज्ञता सक्रिय व्यक्त करा. कृतज्ञता व्यक्त करावयाची म्हणजे काय करावयाचे ? जो वैदिक धर्म व त्याची ती दैवी संस्कृती त्यानंतरच्या शेकडो पिढयानी नानाप्रकारचे सुखदुःख भोगून आपल्या मागील पुण्यवंत पिढयानी आपल्या स्वाधीन केलेली आहे त्या आपल्या धर्माचे - नि - संस्कृतीचे त्यांच्या पावित्र्यासह साचार संरक्षण आणि समर्थन करणे हे कृतज्ञता व्यक्त करण्याचे सर्वोत्तम साधन होय.

—०—

धर्म हा व्यवहारांत आचरण्यास योग्य असला पाहिजे. अन्यथा तो धर्मच नव्हे !

परमेश्वरावर प्रेम करणारे लोक कोणत्याही धर्माचे असोत मी त्यांचा सच्चा सेवक होण्यास सदैव तयार आहे हे खरे धार्मिकाचें लक्षण आहे !

स्वतः आत्मचिंतन करून आपल्या आत्मज्ञानाचा उपयोग समाजकल्याणार्थ करणें हा खऱ्या साधूचा पवित्र अधिकार आहे.

स्वतंत्रता किंवा मोक्ष हाच खरा धर्म होय ; खऱ्या सुखासाठी त्यागाची कास धरा!

लोकांचे दारिद्रच व त्यापासून त्याना होणाऱ्या असंख्य यातना दूर केल्याशिवाय त्यांना धर्माच्या गोष्टी सांगण्यात काही फायदा नाही !

आपल्या गरीब व पंगु निराश्रित बांधवांची सेवा करणे म्हणजेच खरीखुरी ईश्वरसेवा होय.

जगाला केवळ खूष करण्याचाच मार्ग आपण धरला तर जगाचे अकल्याण करण्याचाच दोष आपल्या पदरी येण्याचा संभव अधिक!

अमृतत्वाची प्राप्ती धनाने किंवा मनाने होत नाही तरती केवळ त्यागानेच होते!

निश्चय करा ; विश्वबंधुत्वाचे नात्याने सर्वांच्या कल्याणार्थ मला नरकवास घडला तरी मी स्वतःला भाग्यवान समजेन !

—०—

जनतेची सेवा म्हणजेच परमेश्वराची सेवा.

निःस्वार्थ सेवा म्हणजे निष्काम भक्ती.

मूर्तिपूजकानो जितका वेळ तुम्ही पूजेत व्यर्थ दवडता तितकाच वेळ दीन-दुःखितांच्या सेवेत घालविल्याने परमेश्वर लवकर प्रसन्न होईल.

'जनता जनार्दन' 'पांचा मुखी परमेश्वर' 'नारायण (नार+अयन) लोकसमुदाय. अयन=घर). नारायण म्हणजे लोकसमुदायाचे घर. वरील सर्व शब्दांचा अर्थ जनता म्हणजेच परमेश्वराचे दृश्य स्वरूप।

ज्ञान प्राप्त करावयाचे असेल तर सेवा नार=धर्म स्वीकारला पाहिजे. सेवा म्हणजेच पूजा. आत्मा, परमात्मा मध्य म्हणजे महात्मा! आत्मा हे परमात्म्याचे स्वरूप आहे हे जाणणाऱ्यास महात्मा ही संज्ञा प्राप्त होते.

महात्मा म्हणजेच सत्य, अहिंसा, क्षमा व सेवेचे मूर्तिमंत स्वरूप ! राजा, श्रीमंत, दानवीर, शूर, योद्धा या सर्वांहून महात्मा श्रेष्ठ ; महात्मा सेवक भाव धारण करून स्वतःस पूर्णपणे विसरून जातो.

संसारिक व्यवहार शरीर धर्म म्हणून कर्तव्य समजून आसक्तीचा त्याग करून करण्यात व पूर्णतया सेवक म्हणवून घेण्यात स्वतःस धन्य मानतो तो खरा महात्मा होय.

सेवक व्हावयाचे असेल तर स्वतःस विसरले पाहिजे. सेवकांमध्ये श्रीबजरंगाचे नांव सर्वप्रथम आहे.

प्राणिमात्राची सेवा म्हणजे भक्तियोगाचेच एक रूप होय. प्रत्येक स्त्री पुरुष व प्राण्यांकडे, सर्वांकडेच ईश्वर बुद्धीने बघा. तुम्ही कुणावलाहि मदत करू शकत नाही. सेवा मात्र करू शकता. प्रभूच्या संतांची आणि सौभाग्य असेल तर स्वयं प्रभूची सेवा करा. तुम्ही धन्य आहात कारण तुम्हाला सेवा करण्याचा अधिकार लाभला आहे. इतराना तो नाही ; ही सेवाच तुमच्या पक्षीं पूजा होय ; उपासना होय.

दीन-हीन व्यक्ती दिसतील, स्वतःच्या मुक्तीसाठी तुम्ही जाऊन त्यांची सेवा करा. कारण ईश्वराचा वास तिथे आहे. तुमच्या आमच्या जीवनातील हेच सर्वश्रेष्ठ भाग्य की आपण प्रभूची या भिन्न भिन्न रूपांत सेवा करू शकतो. आपण कोणावर उपकार करतो ही भावना सोडून द्या! तुम्हाला निरभिमान व्हावे लागेल आणि जो कोणी तुम्हाला भेटेल त्याची सेवा करावी लागेल अशा भानाने दुसऱ्याची सेवा करणे हे शुभ कर्म होय, अशा सत्कर्माच्या शक्तीने चित्त शुद्ध होऊन सर्वांच्या अंतर्यामी जो प्रभू - जे भगवान विराजमान आहेत ते त्या चित्तात प्रगट होतात !

आत्मोन्नतीसाठी आणि जगद्धितासाठी आवश्यक असणारे जे दुहेरी ध्येय 'त्याग आणि सेवा' तेच भारतीय संस्कृतीचा प्राण होय, कोणत्याहि धर्माची व जातीची शक्ती असो, आपापल्या कार्यक्षेत्रांत कार्य करीत राहूनहि सर्वजण या उदात्त सेवा व्रताच्या अनुष्ठानाने चित्तशुद्धी करून घेऊन भगवत् लाभाच्या ध्येयाप्रत पोहोचू शकतात आणि सार्थ होऊ शकतात !

—०—

सहकार्य हे जीवनाचे मुख्य तत्त्व आहे. जीवन सुखी करावयाचे असेल तर, सहकार्य केले पाहिजे. जन्म आणि मृत्यू जीवनाची दोन टोके आहेत. त्याचे मधला काळ खूप मोठा असतो ; अनेक प्रकारचीं संकटे, दुःख, आजार इत्यादीने गजबजलेला असतो. जन्मताना एकटे जन्मता येईल, मृत्यू एकट्याने कवटाळता येईल पण मधला काळ निश्चित एकट्यास काढता येणार नाही. त्याला सहकार्याची अत्यंत आवश्यकता

आहे. तुमच्यात दुसऱ्याची सेवा करण्याची क्षमता असेल तर सर्व बाजूनी तुम्हास सहकार्याचा हात लाभेल त्या योगाने तुम्ही निश्चित आपले जीवन सुखी करू शकाल.

क्षमा, दया ही सेवेची उघड स्वरूपे आहेत. तुम्ही सेवाव्रत धारण केल्याने तुमच्या अपराधांची क्षमा केली जाईल. सेवाकार्य केल्याने दयेचे महत्व कळते व मानवी जीवनाला अत्यंत आवश्यक असा जो समाधानाचा आनंद आहे तो लाभतो.

सर्व सुखापेक्षा समाधानाचे सुख अत्यंत गोड आहे. जीवनाला स्थैर्य प्राप्त करावयाचे असेल तर त्यात समाधानाची प्रमुखता अवश्य आहे. मनाची शांतता हे समाधानाचे मुख्य अंग आहे. मनाला शांतता प्राप्त होण्याकरिता त्याला योग्य अशा सत्कार्यी गुंतविणे अत्यंत जरूर आहे. नित्य नेम, पूजा पाठ सामाजिक व धार्मिक कार्ये हे सत्कार्याचे मुख्य अंग आहे. त्यातले काही स्वतः पुरते व काही इतरांना धरून आहेत पण त्यांत सर्वांचे प्रेम संपादन करण्याचे सामर्थ्य नाही. सामाजिक कार्यात थोडा वाव आहे पण मता-मतांचा अतिरेक असल्यामुळे कार्यकर्त्यांना योग्य संधी प्राप्त होणे कठीण असते. परिणामी उत्साह-भंग होऊन कार्य संपुष्टात येते.

सेवा या शब्दाची व्याख्या अशी की ती सुंदर आहे, कोणाचेहि मन न दुखविता सर्वांना सुखी व प्रसन्न करणारी आहे. माणूस कोणत्याहि धर्माचा असो त्याची मते कितीहि जहाल किंवा मवाळ असोत तो सेवा शब्दाचा परिहास करू शकत नाही.

सेवा हे सर्व धर्माचे मुख्य अंग आहे त्यात साक्षात् परमानंदांचा वास आहे. ज्ञानाचे आगर आहे. प्रत्यक्ष वेदांताचे सार त्यात सामावलेले आहे.

सहकार्य व सेवा मानवी जीवनाचे मुख्य स्वरूप आहे त्याशिवाय जीवन अगदी रूक्ष होते.

मानवी शरीरावरून उदाहरण घेण्यासारखे आहे. शरीराच्या सर्व अवयवांच्या सहकार्य व सेवेने मानवी शरीर कार्यक्षम असते. जर का एका अवयवाने असहकार केला व सेवा करण्याचे नाकारले की जीवन कष्टमय होते व सर्व अवयवांनी सेवाकार्य बंद केले की मानवी जीवनाची इतिश्री झालीच समजा !

प्रत्येक मानव हा समाजाचा अवयव आहे. समाज हा देशाशी निगडित आहे. समाजाची उन्नती म्हणजेच देशाची उन्नती ! हे सर्व साध्य करावयाचे तर आपण सर्वांनी सहकार्य व सेवारूपाने हातभार लावायचे आपले कर्तव्य पूर्णतया जबाबदारी ओळखून पार पाडण्याचे निश्चित कार्य केलेच पाहिजे.

जवळच्याना दोष माहित असल्यामुळे ज्याचा जवळच्यावर प्रभाव पडत नाही त्याचा दूरच्याना दोष माहित नसल्यामुळे दूरच्यावर जो प्रभाव पडल्यासारखा दिसतो तो मृगजळ होय. मृगजळ दुरूनच पहावे.

—o—

भारतात धार्मिक व आध्यात्मिक विचारांची वृद्धी पुष्कळ झालेली आहे पण तसे पहाता धार्मिकतेच्या नांवावर बाह्य क्रियाकांड आणि त्याला पूरक कामनापूर्तीची

आशा, दूसरी बाजू आध्यात्मिकतेच्या नांवावर आपापले मत सांप्रदाय आणि पंथाची श्रेष्ठता दाखविण्याकरिता ममत्व व अभिमान व्यक्त होणारे वाद-विवाद, प्रवचन, तथाकथित ग्रंथाची वृद्धी मात्र झाली आहे.

सत्य प्रामाणिकता, उदारता, संयम, न्याय्यवृत्ति सेवा आणि सहकार भावना, अहिंसा सारख्या या नैतिक गुणांचा आधार-धार्मिक क्रियांच्या पाठीशीं असावयास पाहिजे.

आणि कोणत्याहि गूढ गहन सूक्ष्म अज्ञात आध्यात्मिकबाबत शोधून काढलेल्या सात्विक विचाराना पण सत्य नीतिप्रधान आचाराचा आधार असणे अत्यंत आवश्यक आहे. या विचाराच्या आधारे धर्मनिष्ठेला बळ मिळाले पाहिजे. आपले भौतिक व्यवहार सुसंगत, व्यवस्थित आणि कल्याणप्रद असावयास पाहिजेत. अतिथिधर्म, अध्यात्म किंवा कोणतेहि गूढवाद, अथवा गूढशक्ती व त्यांची सिद्धी या सर्वांची परीक्षा व्यवहार शुद्धी त्यातील शुद्धता सरलता व निरुपाधिकता वगैरेवरून झाली पाहिजे.

आपला समाज धार्मिक आहे. धर्म व तत्त्वज्ञान यांचा विकास आपणात पुष्कळ झालेला आहे असा आपला समज आहे आणि साऱ्या जगाची अशी समजूत करण्याचा आपण शक्तिपूर्वक प्रयत्न करीत आहों, परंतु वर सांगितल्याप्रमाणे आपल्या धार्मिकतेचे स्वरूप क्रियाकांडात्मक आणि कामनापूर्तीपुरते मर्यादित आहे. त्यात नीतिनिष्ठेला मुख्य स्थान नाही, त्यामुळे उपरोक्त प्रकारचे तत्त्वज्ञानाचे बाह्यात्कारी स्वरूप वादविवाद व्याख्यान, प्रवचन, लेख, आणि ग्रंथरूपात अबाधित आहे. परिणाम रोजच्या जीवन व्यवहारात धार्मिकता नीति आणि तत्वनिष्ठा यांचा समावेश होत नाही व त्याचे आचरण आग्रहयुक्त नसल्यामुळे या विषयाचे संशोधन व विकास होत नाही. एखादा धार्मिक किंवा तात्त्विक प्रश्न निर्माण झाला की त्याचा निर्णय आपापल्या मानलेल्या धार्मिक संस्कार परंपरेला धरून करण्याची रूढी निर्माण झाली आहे.

स्वानुभव सिद्ध ज्ञानाचा अभाव हेच याचे कारण असावेसे वाटते. अशा प्रसंगी दरेक पंथी, सांप्रदायी, आणि धर्मी, स्वतःच्या धर्मप्रवर्तकाने व त्यांचे पुरातन अनुयायांनी कोणता मार्ग स्वीकारला याची खात्री करतात. त्यामुळे धार्मिक तात्त्विक प्रश्नांचा विचार संशोधनात्मक दृष्टीने होत नाही व चालू परिस्थितीला अनुकूल उपयुक्त प्रगतिशील आणि कल्याणप्रद निर्णय होऊ शकत नाही.

पूर्वीच्या पुराण काळाप्रमाणे आजच्या दुनियेची परिस्थिति राहिलेली नाही. अनेक धर्मविशिष्ट प्रकाराची समाज रचना निर्माण झाली आहे आणि आणि काळ गतींत नित्य बदल होत आहे तेव्हा पुराणकालीन परिस्थितीप्रमाणे निर्णय घेणे योग्य नाही.

# मी साईभक्त कसा झालो

**माधव गजानन गोरे**
ब्लॉक नं. ३, विनायक बाग, पाईप रोड, कुर्ला, मुंबई ७०.

भगवानश्री साईबाबा म्हणतातः—

"माझा माणूस देशावर। असो कां हजारो कोस दूर।
आणीन जैसे चिडीचें पोर। बांधून दोर पायास ॥

अ. २८–ओवी १५

मे १९५३ ची घटना आहे. वार गुरुवार व वेळ रात्री ९ ची होती. मी व माझा मित्र आम्ही दोघेजण एका बंद दुकानाच्या ओटयावर गप्पा मारीत बसलो होतो. एवढयात माझा एक मित्र श्री. शेंबेकर मला बोलवावयास आला व म्हणाला आताच्या आता तू माझ्या बरोबर चल. मी म्हटले मला आता कंटाळा आला आहे. तरीपण तो ऐकेना. त्याचा मला घेऊन जाण्याचा हट्ट होताच. तो म्हणाला मी तुला टॅक्सीने घेऊन जाईन नाहीतर तुला उचलून नेईन असे म्हणून त्याने मला अक्षरशः उचलले. तेव्हा मी त्याला म्हटले तू मला उचलून घेऊ नकोस मी तुझ्या बरोबर चालत येतो. असे म्हणून आम्ही दोघेजण निघालो त्याने तडक मला खेतवाडी तिसरी गल्ली येथे श्री पडते यांच्या घरी नेले. पहातो तर तेथे श्रीसाईबाबांचा द्वारकामाईत बसलेला फोटो होता. व त्याला पुष्कळ हार घातलेले होते. एकंदर तेथील पवित्र वातावरण पाहून मी फारच भारून गेलो. तेथे तीर्थ प्रसाद घेतला व आम्ही निघालो. मग मला शेंबेकरने सांगितले की आजपासून दर गुरुवारी येथे न चुकता येत जा. अशा तऱ्हेने श्रीसाईबाबांनी श्रीशेंबेकरचे निमित्त करून मला खेचून आणले तेव्हा पासून मी नियमित श्रीसाईबाबांचे दर्शन घेत आहे.

# रामगीतांजली

(पुष्प ९)

रावणाने सीतेला पळवून नेले. राम-लक्ष्मणांनी आश्रमात परत येऊन पाहिले तो सीतेचा ठावठिकाणा नाहीं ! राम अत्यंत बावरून गेले - त्यानी फार शोक केला. लक्ष्मणाला ते म्हणतात—

हाय लक्ष्मणा सती जानकी आश्रमांत नाहीं !
जाहली घोर वंचना ही !
भुलली कांचनमृग–मायेला
वळलों मोहीं मनधरणीला
तूं भुललासी शब्द भ्रमाला
अनर्थ घडले परंपरेनें पडलों रे मोहीं !! ॥ १ ॥

पंचवटी ही शून्य जाहली
कुठें हरवली प्रिया मैथिली ?
वृक्षराजि कां मूक राहिली ?
उजाड झाल्या रम्य वनाच्या मला दिशा दाही ॥ २ ॥

कुठें नतांगी वनराजा रे !
मन्दगामिनी गजराजा रे !
कुणीतरी शोधाया जा रे !
कशी तुम्हांला दैवहताची कणव येत नाहीं ॥ ३ ॥

पर्वतशिखरा ! सरिते ! पवना !
विहंगमा तूं उडसी गगना
गतिशीला जलदा हे ! तपना !
कुठें सहचरी माझी गेली सांगा लवलाही ॥ ४ ॥

नकोस सीते करुं परिहास !
चक्रवाक हा राम उदास !
आड तरूंच्या का लपलीस ?
येईं पुढती ! विरह प्रिये मम हृदया दाही ! ॥ ५ ॥

कशास जगणें वचन पाळणें ?
राज्य सांडुनी वनांत फिरणें ?
घरीं एकटें पुन्हा परतणें ?
कशास पाही विधी अचानक कठिण परीक्षा ही ? ॥ ६ ॥

—दिवाकर घैसास (डोंबिवली—पूर्व)

# साईनाथ

## श्रीसद्‌गुरुसाईमहाराज ललित चरित्र

लेखक : र. श्री. पुजारी (पुणे)

### ६. आता लाव म्हणावे मशिदभर पणत्या आणि कर दीपोत्सव !

सकाळी आठ-नऊची वेळ. उन्हे स्वच्छ पडली आहेत. गल्लीच्या या टोका-पासून त्या टोकापर्यंत पसरली आहेत.

शिरडीतील माणसे आता कामाला लागली. कुणी सुताराकडे, कुणी लोहाराकडे, कुणी कुंभाराकडे तर कुणी चांभाराकडे चालली. प्रत्येकाचे काही ना काही काम आहे. वायदा आहे. तो सकाळच्या प्रहरी पुरा होण्यावरच दिवसाचे काम अवलंबून आहे. शेती, धंदा, व्यापार त्याविना अडून रहाणार आहे.

उद्योगधंदा नसलेली, रिकामटेकडी माणसेही शिरडीत काही कमी नाहीत. अशी निरुपयोगी माणसे कोपऱ्या कोपऱ्यावर उन्हाला बसून तंबाखू ओढत आहेत. गप्पांच्या शिळच्या कढीला ऊत आणीत आहेत. उभ्या गावाची बित्तंबातमी त्यांच्याकडे आहे. गावातील प्रत्येक व्यक्तीला त्यानी जोखले आहे. प्रत्येकाबद्दल त्यांचे काही ना काही खास मत आहे. ते मत आता विशेषणाचे रूप घेऊन सर्व गावभर वावरत आहे.

एक तरुण, देखणा फकीर यावेळी बाहेर पडला आहे. झपझप पावले टाकीत वाटेने चालला आहे. जणू तो आपल्याच तंद्रीत आहे. आपणाबद्दल कोण काय बोलते इकडे त्याचे लक्ष नाही. कोपऱ्यावरील मंडळी कोण, हेही त्याला माहीत नाही. माहीत आहे ती गोष्ट एकच: ती म्हणजे अल्लाचे नाम. अल्लाने नेमून दिलेले काम.

एखाद्या इमानी चाकराप्रमाणे हा फकीर सकाळच्या प्रहरी चाकरीस चालला आहे. चाकरीत कसूर झाली तर त्याचा अल्ला मालिक जणू त्याला कडक सजा करणार आहे.

होता होता फकीर एका पडक्या दारासमोर येऊन उभा राहिला. आत डोकावून-डोळे किलकिले करून पाहू लागला.

सकाळच्या प्रहरी घरोघर चुली पेटल्या आहेत. स्त्रिया चुलीपुढील निखाऱ्यावर भाकरी फुलवीत आहेत. हळू हळू भाकरीची चळत चुलीकडे पुढे दिसत आहे. परंतु या घरात मात्र चूल अगदी थंड आहे. तीन चार कच्चीबच्ची दुष्काळातून ओढून काढल्या. प्रमाणे दिसत आहेत. ना पोटात अन्न ना अंगावर वस्त्र. छातीची हाडे मोजून घ्यावीत, ही केविलवाणी मुले थंडीने कुडकुडत आहेत.

अशा या अंधाऱ्या घरी कुणी एक आजारी स्त्री कोपऱ्यात कण्हत आहे. कण्हता कण्हता देवाला गाऱ्हाणे घालीत आहे. "देवा! नारायणा! आता सोडीव एकदा लवकर या दुःखातून. अगदी सोसवेना मला आता. . . ."

ती स्त्री शरीराच्या क्लेशामुळे रडत आहे. तोच तो फकीर त्या ठेंगण्या चौकटीतून वाकून आत पाऊल टाकीत आहे.

त्याला पाहून ती कच्चीबच्ची आनंदाने ओरडत कोपऱ्यातील आपल्या आईकडे धावत आहेत. तिला गदगदा हलवून म्हणत आहेत, "आई! आई! ऊठ! बघ बाबा आले! फकीरबाबा! मशिदीतील साईबाबा!"

ती आजारी स्त्री उठून त्या फकिराच्या पायाला दोन्ही हात लावीत आहे. डोक्यावर पदरे घेऊन, जमिनीवर डोके टेकवून त्यांना म्हणत आहे, "बाबा! तुम्ही कसे अगदी देवासारखे आला! काय करू? अंगातील ताप निघेना, अगदी उठवेना. घरात पोरांचे बघायला कोणी नाही. ही पोरे आणि मी!"

बाबा त्या स्त्रीला कसलीशी मुळी उगाळून देत आहेत. चुलीवर पाणी तापवून देत आहेत. सांजसकाळ कपाळाला लावायला देवाचा अंगारा देत आहेत. जाता जाता धीर देऊन तिला म्हणत आहेत, "आई! तू काही फिकर करू नकोस. ही दवा खा. संध्याकाळपर्यंत तुला बरे वाटेल. आता उठून चुलीपुढे बसू नकोस. पोरांच्या पोटाची सोय अल्ला पाहील. तू मात्र त्याला सांग की आमची सर्व फिकर अभी तुलाच आहे."

अशी किती घरे हिंडून झाली!

किती स्त्रिया, किती मुले, किती वृद्ध--सर्वांना औषधे देऊन झाली. पथ्यपाणी सांगून झाले. पुन्हा उद्या येण्याचा वादा करून झाला.

कुणाच्या पोटात वायगोळा उठला आहे. कुणाच्या पाठीत उसण भरली आहे. कुणाला पोटशूळ आहे. कुणाची दृष्टी जाऊन अंधत्व येऊ पाहात आहे.

सर्व रोगांवर फकिरबाबांजवळ औषध आहे.

सकाळ - संध्याकाळ घरी येऊन फकीरबाबा दवा देतील. कोणाच्या पाठीचे किंवा कमरेचे मालीश करतील. पागोटे घेऊन कुणाच्या पायाचा मुरगळा काढतील. तान्ह्या पोराचे पोट तपासून बायकांनाही माहीत नसलेले आजीबाईच्या बटव्यातील

एखादे औषध देतील. सांगतील, "अल्लाचे नाव घ्या. त्याचा अंगारा कपाळाला लावा. तोच जरा जिभेवर ठेवून औषधाबरोबर पोटात घ्या, की दर्द खतम !"

हळू हळू फकीरबाबांना लोक हकीम बाबा म्हणू लागले. त्यांच्या तोंडावर त्यांची स्तुती करू लागले. कोणी सांगू लागले, "पोटदुखीने गुरासारखा आठ दिवस तळमळत होता. डोळ्याला डोळा नाही. पण बाबाजींच्या हातास काय गुण आहे कळत नाही. त्यानी कपाळावर नुसता हात ठेवला. आणि पाच-सहा तास गाढ झोप लागली. जागा होऊन पाहातो पोटातील भाल्याची भोसकणी थांबलेली. जणू जन्मात कधी पोट दुखले की नाही !"

स्त्रियांची तर बाबांवर देवासारखी श्रद्धा.

तान्ही मुले आणून त्यानी बाबांच्या पायावर घालावीत. मोठ्या भक्तीने बाबांना खायलाप्यायला द्यावे. मुलाबाळांना, लेकी सुनांना बाबांना नमस्कार करण्यासाठी पुढे करावे.

वृद्ध स्त्रियांनी म्हणावे, "बाबा ! आमच्या सारख्या गरीबांना तुमचा आधार मोठा आहे. तुम्ही दारात दिसला की निम्मे दुखणे कमी होते. तब्येतीला उतार पडतो. तान्ह्या मुलांच्या आया तर तुमच्या वाटेकडे डोळे लावून बसतात. तुम्ही आला नाही तर धीर सुटतो. लगेच पोराला म्हणतात: जा ! मशिदीत बाबा असतील त्यांच्या-कडून अंगारा घेऊन ये. बाबांचा अंगारा नुसता कपाळाला लावला तरी माझ्या लेकराचे दुखणे बरे होईल."

वृद्ध माणसे काठी टेकत टेकत बाबांच्या जवळ जाऊन बसत. आपल्या मुला-प्रमाणे असलेल्या बाबांना म्हणत, "बाबा ! फार दमला तुम्ही. गावभर किती फिराल? आता दोन घटका जरा बसा. गूळ-शेंगा खा. पाणी प्या. मग संध्याकाळच्या वेळी निवांत कोठे जायचे तेथे जा."

पण बाबा कोठे जाणार ? त्याना ना घर ना दार. ना बायको ना मुले. जेथे बैठक जमेल तेच बाबांचे घर. मग ती देवीदास बाबांची मठी असो ; म्हाळसापतींचे घर असो; काशीरामाचे दुकान असो; की मारुतीचे, अथवा विठोबाचे देऊळ असो.

तासन् तास बाबा बैठकीत असत. दिलखुलासपणे प्रेमाच्या गोष्टी बोलत. रात्र संपे; पण गोष्टी संपत नसत. मग कधी देवीदासबाबा तर कधी म्हाळसापती मशिदी-पर्यंत बाबांना पोचवायला जात. बाबा मशिदीत शिरत. ती मंडळी परत आपल्या ठिकाणी येत.

हळू हळू गावातील भाविकात बातमी पसरली: बाबांचे बोलणे फार मिठास. अगदी खडी साखर ! जसे मनात घोळवावे तसे गोडच. मनाला अतिशय आनंद, समाधान देणारे.

दुसरे कोणी सांगू लागले "बाबांचे नुसते शब्दच गोड नसतात; तर बोलतात तो एक निखळ वेदांत. तो ऐकत असताना देहभान हरपते. बाहेर रात्र झाली याचे भानही उरत नाही. वाटते: बाबांनी नुसते बोलत राहावे. आपण नुसते ऐकत राहावे.

"देवीदासबाबा, जानकीदासबाबा याना तर बाबांशिवाय आता एक घटका-भरही करमत नाही. हातातील जपमाळ खाली ठेवतात. रानात, अरण्यात, मळ्यात जेथे बाबा असतील तेथे काटेकुटे तुडवीत जातात. म्हणतात: "बाबा! हे काय? तुम्ही एकटेच येथे येऊन बसला? तुम्हाला किती शोधावे! शेवटी आम्ही मनात म्हटले: मागे तुम्ही या गावातून अकस्मात पळून गेलात तसे पुन्हा केलेत की काय!"

बाबांविषयी अशा गोष्टी घरोघरी मोठ्या प्रेमाने बोलल्या जात. बाबांचे वेचटी बोलणे, मार्मिक दृष्टांत देणे, मुलांशी किंवा स्त्रीयांशी हास्यविनोद करणे या गोष्क आता सर्वांना माहीत झाल्या. वृद्ध स्त्रिया बोलू लागल्या, "सात-आठ वर्षांपूर्वी बाळ-रूपाने रानात दर्शन झाले तेव्हांच वाटले की बाळरूप घेऊन प्रत्यक्ष देवच आपल्या गावी आला आहे. तो येथे राहाणार आहे. देव श्रीकृष्ण बाळरूपाने नंदाच्या घरी द्वारकेस कसे राहिले! तसा."

भाविक पण विचक्षण पुरुष बाबांच्या पूर्ववृत्ताविषयी विचार करू लागले. म्हणू लागले, "गैबी रूप घेऊन श्रीदत्तात्रेयच आपल्या गावी आले आहेत. मुसलमाना-सारखा वेष, मशीदीत राहाणे या गोष्टी काय सुचवितात? आधीचे ते अक्कलकोट स्वामीच आहेत."

"फकिरांना खाना देणे, कबरींना गलेफ घालणे या गोष्टी स्वामींना फार प्रिय होत्या. तेही असेच भटकत. बाह्यत: असेच विक्षिप्तपणे वागत. पण अंतर्यामी लोक-कल्याणाची तळमळ रात्रंदिवस लागलेली."

कोणी सांगू लागले, "अक्कलकोटचे स्वामी हेच बाबांचे गुरू. लहानपणी अक्कल-कोटास असताना बाबा सकाळ संध्याकाळ मशीदीतून येऊन स्वामींना नित्यनेमाने हुक्का भरून देत. या अनन्य सेवेमुळेच स्वामी त्यांच्यावर प्रसन्न झाले. स्वत:च्या पायातील चांदीच्या पादुका काढून यांच्याकडे फेकल्या. म्हणाले: जा! गोदातीरावर जाऊन माझा झेंडा रोव. लोकांना खऱ्या धर्ममार्गाला लाव."

"त्यावेळेपासून बाबा इकडे आले. आपल्या गुरूंच्या पादुकांना पुढे ठेवून तप करू लागले. ते भुयार म्हणजे माझ्या गुरूंच्या समाधीचे पवित्र स्थान आहे, त्याचा असा बाजार मांडू नका असे बाबा जे म्हणाले ते खरेच आहे."

कोणी म्हणाले, "शिवभक्ती केल्यामुळे शिवाच्या कृपेमुळे एका धर्मनिष्ठ, सदाचारसंपन्न मातापित्यांच्या पोटी आलेला हा एकुलता एक पुत्र. हा पुत्र एका

मुसलमानास रानात सापडला. तो त्याने घरी आणला. पुत्रवत् त्याचे पालनपोषण केले. बाबांवर मुसलमानी वातावरणाचे जे संस्कार आहेत ते याचमुळे. अन्यथा बाबा हिंदू असून त्यांचे कानही लहानपणीच त्यांच्या जन्मदात्यांनी टोचलेले आहेत."

बाबांच्या पूर्वायुष्याबद्दल अनेक माणसे अनेक तर्क करू लागली. हे सर्व बाबांच्या माघारी चाले. परंतु प्रत्यक्ष बाबांपुढे जाऊन त्यांना विचारून खात्री करून घ्यावी हे धैर्य कोणालाही होईना. जणू बाबा म्हणजे अंत नसलेल्या समुद्राप्रमाणे अनंत, हिमालयाच्या शिखराप्रमाणे अजिंक्य !

शेवटी एकाने धीर करून एक दिवस बाबांनाच विचारले. तेव्हा बाबा हसून म्हणाले, "मी कोण होय ? मी तर त्याचा बंदा गुलाम ! त्याची आज्ञा मी पाळतो. तेच माझे काम. बाकी सर्व काही तो करतो. नाव मात्र माझे ! "

"गुलामाचे, बंद्या नोकराचे काय ? त्याला वेगळे नाव-गाव-घर नसतेच. त्याच्या मालकाचे नाव, तेच त्याचे नाव. मालकाचे गाव, तेच त्याचे गाव. मालकाचे घर, तेच त्याचे घर. मालक प्रसन्न झाला की तिजोरीची किल्ली त्या नोकराच्या हाती !"

बाबांचे असे बोलणे ऐकून भक्त म्हणत, "गाणगापुरास असताना दत्तगुरू श्री-स्वामी नृसिंहसरस्वती सामान्य माणसाप्रमाणे संगमावर सकाळ संध्याकाळ अनुष्ठान करीत. तसे बाबा स्वतः देव असूनही गुरुपादुकांना शिरोधार्य मानतात. पंढरीच्या विष्णुरूप विठोबाने शिवलिंग मुकुटवत् मस्तकी धारण करावे किंवा देवाधिदेव शिवांनी रामनामाचा जप करावा अशातीलच हा प्रकार ! "

"एकूण काय, साक्षात परब्रह्म असे जे गुरू त्यांचे सनातन पीठ जागृत राहावे, लोकांनी त्या पीठासमोर माथा नमवावा अशी बाबांची इच्छा. ती पुरी करण्यासाठी ते स्वतःच्या आचरणाने लोकांना धडा घालून देत आहेत. अवतारी पुरुष लोकांवर कृपा करण्यासाठी लोकशिक्षणाचा मार्ग अवलंबतात तो हाच. नाही तरी रामदासांनी म्हटलेच आहे.: आधी केले, मग सांगितले. तुकोबांनी तर याच्याही पुढे जाऊन वाचाशूर लोकांची चांगली खरडपट्टी काढली: लोका सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडा पाषाण !

"म्हणून म्हणतो की बाबांची गुरुभक्ती केवळ लोकांना शिकविण्यासाठीच आहे. गुरूचे माहात्म्य वाढावे यासाठीच आहे."

एकीकडे बाबांविषयी भक्तांची ही अशी श्रद्धा; तर दुसरीकडे एखाद्या घरी उठता - बसता, खाता - पिता बाबांची अखंड टवाळी. निंदा. कुचाळकी.

टवाळखोरांनी म्हणावे, "त्या फकीरबाबाच्या अंगाऱ्याने जर माणूस असे बरे झाले असते तर वैद्य–डॉक्टर–हकीम यांची गरज काय ? त्यांनी आपली औषधे

"अशी भगत मंडळी येथे असल्यावर या साईने रोज एक थेर का करू नये !"

—हळू हळू गावातील तरुणांच्या एका गटाने एक निष्कर्ष काढला: हा फकीर वेडसर नसून पक्का शहाणा आहे ! नुसता शहाणाच नाहीं; तर पक्का लबाड आहे!

यामुळे दुजोरा मिळून की काय एक दिवस पेठेतील दुकानदारांनी ठरविले: हा साई आपल्या दुकानासमोर वाटेल तितका वेळ थांबो; याला तेल म्हणून कोणीही आज द्यायचे नाही. याच्याकडे सर्वांनी पूर्ण दुर्लक्ष करायचे !

होता होता संध्याकाळ झाली.

हातात पत्र्याचे टमरेल घेऊन फकीरबाबा नेहमीप्रमाणे प्रत्येक दुकानासमोर थांबू लागले. टमरेल पुढे करून तेलाची याचना करू लागले. परंतु कोणीही दुकानदारांनी त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. जणू फकीरबाबा त्यांच्या दुकानासमोर उभे नव्हतेच.

लोकांच्या या असहकाराचा परिणाम व्हायचा तोच झाला. फकीरबाबा आले तसे हात हलवीत परत गेले.

त्यांना पाठमोरे झालेले पाहून दुकानदार म्हणू लागले, "आता लाव म्हणावे सर्व मशीदभर पणत्या ; आणि कर दीपोत्सव ! अहो, दुसऱ्यांच्या जिवावर रात्रभर पणत्या जाळायला याचे काय जाते ! साई साई म्हणून सगळ्या गावाने याला डोक्यावर घेतला; आता पुरवा म्हणावे हेही त्याचे कोडकौतुक तुम्हीच; आणि करा म्हणावे दिवाळी त्या पडक्या मशीदीत साजरी !"

**७. हे फुटके अडाणी खेडे आता गंगोत्रीप्रमाणे पवित्र झाले.**

त्यानंतर दुसरे दिवशी सकाळी आठ-नऊ वाजण्याची वेळ. हातात केरसुण्या, घमेली, कुदळी, फावडी घेऊन काही मंडळी मशीदीच्या रोखाने निघाली. त्यांच्याकडे पाहात पाहात गावातील रिकामटेकडी मुलेही निघाली. जणू आपल्या वडीलधाऱ्यांनी आज सकाळी उठल्या उठल्याच ही काय स्वच्छता-मोहीम काढली आहे हीच उत्सुकता त्या मुलांच्या डोळयांत प्रत्येक क्षणी दिसत होती.

होता होता मंडळी मशिदीच्या आवारात शिरली. अंगावरील पैरणी काढून एका बाजूस ठेवल्या. धोतरांचे काचे कसून मंडळी कामास लागली.

कोणी शेजारच्या घरून शिडी आणली. तिच्यावर चढून काठीच्या टोकास केरसुणी बांधून छप्पर झाडण्यास सुरुवात केली. कोणी चिखल केला. दगडगोटे जमविले. भितींना पडलेली भोके, भगदाडे, चिरंड्या बुजविल्या. कोणी धावत गेले आणि शेण आणले. शेजारच्या विहरीवरून पाणी आणून मातीशेणाने भिंती सारविण्यास सुरुवात केली. एवढ्यात शेजारच्या कोणी स्त्रिया आल्या. शेणकाला करून

मशिदीची दोन खणी जमीन हा हा म्हणता सारवून, हातपाय विहिरीवर स्वच्छ धुवून घरी गेल्या.

लहान मुले डोळे विस्फारून, माना उंच कर-करून हे सर्व पाहात होती. एक-मेकांना सांगत होती, "माझा बाबा सकाळी म्हणत होता की फकीरबाबा म्हणजे देवच आहेत. त्यांची भक्ती केली म्हणजे आपल्याला पुण्य लागते. शेत चांगले पिकते. पाटलाच्या मळ्यात एक दिवस सकाळी जाऊन बसले, तर त्याचा मळा पिकला. विहिरीला बारा मोटांचे पाणी लागले. काल संध्याकाळीं पेठेतील वाण्यांनी बाबांना तेल दिले नाही. तरीसुद्धा बाबांच्या पणत्या रातभर तेवत होत्या. बाबांनी तेला-ऐवजी पाणी भरून पणत्या पेटविल्या."

मोठी माणसेही सकाळच्या प्रहरी आपल्या उद्योगाला जाताना वाटेत थांबत होती. रात्री पाण्यावर तेवलेल्या पणत्यांची हकीगत एकमेकाना माहीत असूनही सांगत होती. आश्चर्य व्यक्त करीत होती. मशिदीत आज प्रथम होत असलेली ही झाडलोट, साफसफाई, सारवण-लिपण मोठ्या कुतूहलाने पाहात होती. म्हणत होती, "खरोखर या मशिदीचे भाग्य आज उदयास आले. एऱ्हवी कोणी काळे कुत्रेसुद्धा इकडे फिरकत नव्हते."

गावकऱ्यांचे म्हणणे खरे होते. कित्येक वर्षांत त्या मशिदीत कोणी पाऊलसुद्धा टाकले नव्हते. भोवती रान माजले होते. ते कुऱ्हाडींनी तोडून आत गेल्यानंतर कळले की येथे कोणाची वस्ती नाही कशी? कबुतरांनी आणि पाकोळ्यांनी येथे आपल्या वस्तीची निशाणी ठेवली आहे. त्यांच्या विष्ठेचे थर येथे साचले आहेत. दहा वेळा दाट शेणाने सारवून ही भुईजमीन स्वच्छ होण्याच्या पलिकडे गेली आहे.

हळू हळू मुलांची गर्दी तेथे वाढू लागली. माळवद झाडता झाडता शिडीवरील माणसे खाली पाहून मुलांवर ओरडू लागली, "अरे! येथे तुमचे काय ठेवले आहे? पुनः पुन्हा आत का येता? आधीच वरचे छप्पर जीर्ण झाले आहे. त्याच्यातून माती खाली पडत आहे. ते जर खाली आले तर सगळेजणच खाली गाडले जाल! फुकट मराल!"

मुलांना बाहेर हाकलीत शिड्यांवरील माणसांचे काम मोठ्या नेटाने, भक्तीने चालले आहे. माणसे एकमेकांशी शिडीवरूनच बोलत आहेत. म्हणत आहेत, "
"दिवसाढवळ्यासुद्धा येथे येण्याची कोणाची छाती नाही. मग बाबा रात्री येथे एकटे कसे काय राहात असतील?

"जमिनीला गुड्घा गुड्घा खड्डे. वरून छपरातून सारखी माती पडते. वळचणीला कबुतरे. आढ्याला उलट्या टांगलेल्या पाकोळ्या. त्यांची विष्ठा वरून

सारखी पडत आहे. धड अंथरायला नाही, पांघरायला नाही. थंडीला जवळच्या फाटक्यातुटक्या गोणपाटाचा काय तो एक आधार.

"जो प्रत्यक्ष देव, कुबेराचे भांडार ज्याच्यापाशी, त्याने हे दैन्य का भोगावे? दीनवाणे होऊन असे का राहावे? परंतु विचार करता करता वाटते की हाच देव भक्तासाठी दळू-कांडू लागला. उष्टी-खरकटी काढू लागला. घोड्यांना दाणागोटा करून त्यांचा खरारा करू लागला. तोच येथे येऊन गरीब, भिकारी, आंधळे, थोटे यांचे दुःख भोगू लागला तर काय आश्चर्य! आपल्या पोटाचे लेकरू जेवलेले नसेल तर त्याची माय तोंडात पाणी तरी कशी घालील?"

माणसे एकीकडे काम करीत होती. दुसरीकडे तोंडाने बाबांविषयी बोलत होती.

म्हणत होती, "माणसांसारखीच सर्व माणसे. हात, पाय, नाक, कान, डोळे, तोंड–सर्वांचे सारखे. पण अंतरंगातील रंग बाहेरच्या माणसास कसे कळणार? काही निमित्ताने ते दिसले तरच.

"आपणास वाटे: बाबा म्हणजे एक भिकारीच आहेत. सगळ्या गांवाचे तुकडे गोळा करतात! काला करून या मशिदीत बसून खातात! आता इतक्या वर्षांनी ध्यानी आले की हे सर्व दुसऱ्यांसाठी. जिभेच्या गुलामीची बेडी तोडा हे दुसऱ्यांना शिकविण्यासाठी!

"भिक्षेच्या अन्नासारखे पवित्र अन्न नाही. राजाधिराज श्रीदत्तात्रेयांचे चित्र बघा. काखेस झोळी. पुढे श्वान. श्वान हे वेदांचे प्रतीक. अशी चार कुत्री श्रीदत्तात्रेयांच्या नित्य भोवती. भिक्षेस बाहेर पडले की बरोबर कुत्री.

"बाबांना पाहून कुत्री आनंदाने धावत येतात. बाबांकडे प्रेमाने पाहात उभी राहातात. जणू बाबा म्हणजे साक्षात अवधूत श्रीदत्तात्रेय. अशा भिकाऱ्याचे दास्य करणे कुणास आवडणार नाही? नाही तरी बाबा नेहमी म्हणतातच: अमीरीपेक्षा गरीबी लाख पटीने चांगली. गरीबीसारखे सुख दुसरे कशातही नाही.

"पण हे गूढ आम्हा कोणाला आजवर उकललेच नाही. ते उकलावे म्हणून हा वेष घेतला. गरीबातील गरीब झाले. छान बतावणी केली. पण काल रात्री येथे पणत्यांचा लख्ख प्रकाश झाला आणि आमची मने उजळली. जणू हजारो वर्षांचा अंधार मनातून एका क्षणात गेला.

"बाबांचे म्हणणे एकच: देवाने मनात आणले तर काय होणार नाही? कुबेराचे भांडारही एखाद्या भिकाऱ्याच्या पायाशी लोळण घेत येईल.

"आता एक एक अर्थ ध्यानी येत आहेत. कच्च्या घागरी म्हणजे आमच्यासारखी अर्धेकच्चे ज्ञान असलेली माणसे. घाग म्हणजे भक्तिप्रेमाचा

मळा. लाकडांचे ढलपे म्हणजे स्वार्थादिक. अंगारा म्हणजे ईश्वराच्या साक्षीने जाळलेल्या स्वार्थाची पवित्र राख.

"कच्ची मडकीसुद्धा जीवमान असे तो देवाची फुलबाग फुलवू शकतील. भक्तिप्रेमाच्या मळ्याची शिंपण करू शकतील. स्वार्थाचे साचलेले ढलपे एक दिवस पेट घेऊन दुसऱ्यांची घरेही जाळू शकतील किंवा यज्ञाचा अग्नीही प्रदीप्त ठेवू शकतील. ज्यात स्वार्थाचा, लोभाचा, वासनांचा लवलेशही नाही तेच केवळ कपाळी धारण करण्याच्या योग्यतेचे. पवित्र. मंगल."

मंडळी म्हणू लागली, "आपल्या गावाचे भाग्य थोर, म्हणून ही मूर्ति पुन्हा परत आली. आमच्या मनातील सर्व शंकांचे निरसन आपल्या आचरणाने करून सर्वांच्या घरची झाली. परंतु हे आम्हास उमगलेही नाही. म्हणूनच की काय काल आम्हा सर्वांच्या डोळ्यांत त्यांनी झणझणीत अंजन घातले. तेलाशिवाय-सुद्धा बाबा मशिदीत दीपोत्सव करू शकतात हे सर्वांना नाइलाजाने दाखवून दिले.

"आता तुम्ही पाहालच की उरलेसुरले गावातील टवाळखोरही येथे येतील. बाबांची क्षमा मागून आम्हाप्रमाणेच त्यांच्या चरणांचे दास होतील. आपले सर्वस्व त्यांच्या चरणी अर्पण करतील. कारण पाणी नेहमी समुद्राच्या त्या, महातीर्थाच्या दिशेने वाहात असते. त्याला गंगेचे पावित्र्य आणून योग्य दिशा दाखविणारे मात्र कोणी तरी हवे असते. ती विभूति आता या शिरडीस लाभली. हे फुटके अडाणी खेडे आता गंगोत्रीप्रमाणे पवित्र झाले."

## श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने

श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने ही नवीन लेखमाला श्रीसाईलीला एप्रिल १९७४ च्या वर्षारंभ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. श्रीबाबांच्या असंख्य भक्तांना ही नाविन्यपूर्ण सचित्र लेखमाला निश्चित वाचनीय व संग्राह्य वाटेल.

—संपादक

# आस

तुझ्या दर्शनाची ओढ मज विठ्ठला लागली
आस माझी पुरवावी विनवितो मी माउली ।।

तुझ्या कृपाछत्राखाली देईं निवारा आसरा
नित्य तुझे गुणगान मज गाऊं दे ईश्वरा ।।

टाळ, मृदंग वीणेचे घुमूदेत सूर दूर
भाव भक्तीच्या लयीत नाचू देत रे नूपूर ।।

तुझ्या सेवेमाजी देवा धूप कर्पूर जळती
परी भक्तीची ती वलये तुझ्या भवती फिरती ।।

नाम तुझे घेता घेता, सरो माझे हे जीवन
घेईं माझ्या रे आत्म्यास, तुझ्या मध्यें सामावून ।।

—वसंत ल. गोखले.

# ओढ

सखी, ओढ हरीची लागली
गडे ! तहान भूक माझी हरपली ।। ध्रु. ।।

असे जरी तो भारी नटखट
पडली जेव्हां माझी गाठ
भक्तीची ज्योति मनीं उजळली ।। १ ।।

प्रहर दुपारी यमुनातीरी
तो घुमवीत असतां मधुर बांसरी
मी होईन त्याची साउली ।। २ ।।

नंदसुताचा छंद लागला
जपून ठेविन हृदयीं त्याला
माझी-काया हरीरूप जाहली ।। ३ ।।

वसंत ल. गोखले.

"सबैजीव साई के प्यारे"

असे सांगणारा—

# संत कबीर

लेखक :—**विनायक पाठक**

**काळाची गरज :**

काळाची नितांत गरजच साधुसंतांच्या जन्माला कारणीभूत होत असते. ज्या ज्या वेळीं धर्मावर उदासीनतेचे सांवट पडते, धर्माचा नाश होतो आणि अधर्म माजतो त्या त्या वेळी प्रत्यक्ष भगवंतच साधुसंतांच्या रूपात अवतार घेत असतो.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहं ।।**
या गीतेतील भगवंताच्या आश्वासनाचा हाच गर्भितार्थ असावा असे दिसते.

**तात्कालीन परिस्थिति :**

अलाउद्दीन खिलजी, महंमद तुघलक, तैमूरलंग आदींच्या आसुरी आक्रमणांनी हिंदु समाज खिळखिळा होऊन गेला होता. त्याला जीविताची शाश्वती उरली नव्हती. त्या नैराश्याची फलश्रुति म्हणजे त्याचा स्वाभाविक कल ईश्वर भक्तीकडे झुकूं लागला. तो ईश्वराची आळवणी-आराधना करूं लागला. पण ईश्वरी आराधनेनेही प्राप्त परिस्थितींत काही बदल होत नाही असे दिसल्यावर मात्र हिंदु समाजात तीव्र वैफल्याची भावना निर्माण झाली व तो हळू हळू आस्तिकतेकडून नास्तिकतेकडे वळूं लागला. अशा हिंदु समाजाच्या मानसिक ओढाताणीच्या अवस्थेतच कबीररूपी दैदीप्यमान तारा भारताच्या क्षितिजावर उगवला.

**संक्षिप्त चरित्र :**

कबीराच्या जन्माविषयी ब-याच दंतकथा प्रचलित आहेत. असे म्हणतात की— कबीराचा जन्म एका ब्राह्मण विधवेच्या पोटीं झाला. पण लोकलज्जेमुळें अथवा लोकभयामुळें त्या विधवेनें हें नवजात बालक जन्मताच फडक्यात गुंडाळून एका झुडपात टाकून दिले. रस्त्यावरून जाणाऱ्या एका अपत्यहीन नीरू-नीमा नामक

कोष्टी दांपत्याला ते बालक दिसले. त्यांनी ते गोजिरवाणे अर्भक प्रेमाने उचलून घरीं नेले व त्याचे संगोपन केले.

तसें पाहिले तर कबीराची जीवनविषयक प्रमाणभूत सत्य माहिती खूपच कमी उपलब्ध आहे. आणि जी काही माहिती आज उपलब्ध आहे ती पुष्कळशी सांगोपांगीवरूनच एकत्रित केली गेलेली दिसते. तथापि कबीराच्या जन्मासंबंधी कबीर पंथीयांत खालील गीत प्रमाणभूत मानले जातेः—

**"चौदह सौ पचपन साल गए**
**चंद्रवार एक ठाठ ठए**
**जेठ सुदी बरसायत को**
**पूनममासी तिथि प्रगट भए॥"**

म्हणजेच संवत् १४५५ साला नंतरच्या येणाऱ्या १४५६ च्या ज्येष्ठ शुक्ल पौर्णिमेला सोमवारी कबीराचा जन्म झाला असे ग्राह्य मानण्यात येते.

आपल्या मातापित्या संबंधींचा कुठलाच संदर्भ कबीराच्या काव्यात सांपडत नाही. तथापि स्वतः कोष्टी असल्याचा व बनारसचा राहणारा असल्याचा संदर्भ त्यांच्या खालील पद्यांत आढळतोः—

**"जाति जुलाहा मति को धीर**
**हरषि हरषि गुण रमै कबीर**
**मेरे रामकी अभैपद नगरी"**

**"कहै कबीर जुलाहा**
**तूं ब्राह्मन मैं काशीका जुलाहा॥"**

विधवा ब्राह्मण स्त्रीच्या पोटी जन्म व मुसलमान कुटुंबात पालनपोषण या दोन्हीं गोष्टींमुळे कबीरांच्या जीवनांत हिंदु आणि मुस्लीम अशा दोन्हीं संस्कृतींचा मनोहर संगम आढळून येतो हे मात्र खरे!

कबीरांचे बालपण मगहर या गावीं झाले. आयुष्याच्या उत्तरार्धात ते काशीस वास्तव्य करते झाले पण त्यांच्या जीवनाची इतिश्री मात्र मगहर या गावीच झाली. कारण सिकंदर लोदीच्या राजहट्टामुळे कबीराला काशी सोडून मगहरची वाट धरणे क्रमप्राप्त झाले. या संदर्भात :—

**"तोरे भरोसे मगहर बसिया । मेरे तनकी तपन बुझाई ।"**

हा कबीराच्या एका पदातील उल्लेख बोलका आहे.

**सद्‌गुरूच्या शोधात :**

असे म्हणतात की तरुणपणीच आपली भजनें, गीते गाऊन कबीर लोकांना उपदेश करीत फिरत असत. पण त्यांना लोक 'निगुरा' (म्हणजे बिनगुरूचा चेला) म्हणून चिडवीत. ज्याने कोणा गुरूचा उपदेश ग्रहण केला नाही तो दुसऱ्यांना काय उपदेश करणार ? म्हणून लोक त्यांचा उपहास करूं लागले. अशातच "गुरुबिन कौन बतावे बात"? ची तीव्र जाणीव कबीराला झाली व त्याचीच अभिव्यक्ति त्यांच्या खालील पद्यांत स्पष्ट झालेली आढळते.

**"गुरु बिन चेला ज्ञान न लहै ।**
**गुरु बिन इह जग कौन भरौसा**
**काके संग ह्वै रहिए ?" ॥**

गुरुकृपेमुळे अशक्य ते शक्य होऊं शकते असा कबीरांचा दावा त्यांच्या खालील ओळीत दृष्टिगोचर होतो—

**"गुरुप्रसाद सुई कै नाकै**
**हस्ती आवै जाहि ॥"**

ही कबीरांची अनुभूति **"मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्"** सारखीच नव्हे का ? या निस्सीम श्रद्धेतूनच कबीरांनी रामानंदांचा गुरूपदेश घेतला. या संदर्भात कबीर गंगाघाटाच्या एका पायरीवर पडून राहिले असता त्यांना रामानंदांचा पदस्पर्श झाला व त्यांनी 'राम राम' म्हणतांच तोच गुरुमंत्र समजून कबीरांनी रामानंदांना मानसगुरु केल्याची एक आख्यायिका प्रसिद्धच आहे.

**कबीरांचा एकेश्वरवाद :**

कबीरांनी जीवनभर **"निरगुण राम निरगुण राम जपहुं रे भाई"** असाच उपदेश केला. कबीराची रामविषयक कल्पना व भारतीय ब्रह्मभावना या दोन्हींची खूपच जवळीक प्रतीत होते.

**हिंदु-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कर्ता :**

कबीरांना हिंदु, मुसलमान, सूफी आदि संत फकीरांचा सत्संग लाभला होता. त्यामुळे हिंदूंच्या भाव-भावनांप्रमाणेच मुसलमानांच्याही जीवनमूल्यांचे मनोहर मिश्रण कबीरांच्या जीवनात व पर्यायाने काव्यात आढळते. त्यांनी जरी आपल्या पद्यातून भारतीय ब्रह्मवादाला साकार केले असले तरी ते रूप साकारण्यासाठी त्यांनी जी विश्लेषणात्मक वर्णने केली आहेत ती मुस्लीम एकेश्वरवादाशी मिळती जुळती

आढळतात. हिंदु-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कर्ता म्हणून कबीरांचा गौरवानेच उल्लेख करावा लागेल.

**कबीरांचे तत्त्वज्ञान :**

श्रीगौतमबुद्ध प्रणीत "दु:ख-सत्य" सिद्धांताप्रमाणेच कबीरांचाही एक तसाच सिद्धान्त होता आणि तो म्हणजे "दुनिया भाँडा दु:ख का भरी मुँहा मुँह मूष।" हा सगळा संसार म्हणजे फक्त दु:खाचेच माहेरघर आहे! माया हीच वासनांना जन्म देणारी म्हणून परिणामी माणसाचा अध:पात करणारी आहे असे सांगताना कबीर एके ठिकाणी म्हणतात :—

**"इक डाईन मेरेमन बसे**
**नित उठि मेरे जिय को उसै**
**या डाईन के लरिका पाँचरे**
**निसिदिन मोहि नचावे नाचरे।"**

या मायेचे काम, क्रोध, लोभ-मोह, मद आणि मत्सर हे पाच कुपुत्र माणसाच्या नाशासच कारणीभूत होतात. कबीरांचे वरील पद गीतेतील

**"ध्यायतो विषयान् पुंसः संगस्तेषूपजायते।**
**सङ्गात् संजायते कामः कामात् क्रोधोऽभिजायते॥**
**क्रोधाद् भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः।**
**स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति॥**

या श्लोकांशी तंतोतंत सहमत असलेले आढळते.

**"सबै जीव साई के प्यारे" :**

कबीरांचा रोष जाती-पाती, धर्म-अधर्म, स्पृश्यास्पृश्य वगैरे संकुचित वृत्तींवर व अंधश्रद्धा, रूढिवादावर असलेला आढळतो. "सबै जीव साई के प्यारे" ही कबीरांची शिकवणूक होती. धार्मिक सुधारणा व सामाजिक सुधारणा यांचा अन्योन्य संबंध आहे अशी कबीरांची धारणा होती. हिंदूंची मूर्तिपूजाविषयक अवडंबरे, शिवाशिवीचे स्तोम, मुसलमानातील चुलतबहिणीशीं लग्न करण्याची चाल वगैरे जे जे अमंगल दिसले त्याची परखड शब्दात त्यानी हजेरी घेतली.

**कबीरांची काव्यरचना :**

कबीरांची पदें, साक्या, दोहे वगैरेप्रकारची बरीच काव्यरचना आहे. त्यांनी आपल्या निरनिराळ्या साक्यांतून जनसमाजाच्या लौकिक आचरणाचे विश्लेषण केलेले आढळते, तर पदांमधून धार्मिक सिद्धांतांसंबंधीचें विवेचन व उपदेश केलेला

आढळतो. प्रगाढ अनूभूति हा कवीरांच्या काव्याचा स्थायीभाव असून त्यांची बहुतेक सगळी पदे गेयतेच्याही कसोटीवर उतरणारी आहेत.

कबीर फारसे शिकलेले नसल्यामुळे त्यांच्या काव्यात धेडगुजरी भाषेचा दोष आढळतो. निरनिराळ्या जातीतील साधुसंतांचा फकीरांचा समागम व परस्परांतील वैचारिक आदान प्रदानामुळेही हा दोष आला असेल. तीव्र अनुभूति आणि उत्कट भावनोद्रेक शब्दबद्ध करताना त्यानी उर्दू, फारसी, संस्कृत शब्दांचा सर्रास उपयोग केला आहे.

**कबीर चौरा**

**जे जे उत्तम उदात्त, उन्नत ते ते सर्व ग्रहण करावे** ही सर्वसमावेशक वृत्ती असणाऱ्या या संत कवीच्या मृत्यूविषयीही मोठी मजेदार आख्यायिका आहे. कवीरांचे हिंदु मुसलमान दोन्ही शिष्य असल्यामुळे मृत्यूनंतर त्यांच्या शवाचे दहन करायचे की दफन यावरून दोन्ही जमातीत वादंग माजले व त्या वादंगाची मजल एकमेकांवर तलवारी उपसण्यापर्यंत गेली. पण जन्मभर ज्यांनी हिंदु-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार केला त्यांच्या आत्म्याला ते सहन झाले नाही, आणि आकाशवाणी झाली "खोटया प्रतिष्ठेसाठी भांडू नका. माझ्या प्रेतावरची चादर तर काढून बघा!" आणि काय चमत्कार? त्या चादरीखाली होता फक्त फुलांचा ढीग. त्या फुलांचा अर्धा अर्धा हिस्सा दोन्ही जमातींनीं वाटून घेतला. मुसलमानांनी आपल्या हिश्शाची फुलें मगहर या ठिकाणी पुरून त्यावर एक कबर उभारली. व हिंदूंनी आपला फुलांचा वाटा दहन करून त्याची रक्षा काशीला समाधिस्थ केली. अजून ती समाधी काशीस "कवीर-चौरा" या नावाने प्रसिद्ध आहे.

——×——

# लक्षात ठेवा

——अनुवादक :–श्री. हे. घ. कुलकर्णी

(" कल्याण " मासिकाच्या सौजन्याने)

१) सुखाची अपेक्षा करतां परंतु मिळत नाही यांचे मुख्य कारण म्हणजे चित्ताची अशांती, आणि अशांतीचे मुख्य कारण भगवंतावर विश्वास न ठेवणे आणि अनास्था. त्याचप्रमाणे विषयसुखात विश्वास आणि आस्था विषयसुख प्राकृतिक पदार्थ आहे जो स्वाभाविकपणेच अपूर्ण, अनित्य आणि विनाशी आहे.

२) प्राकृतिक विषयांनी शांतिसुखाची अपेक्षा करणारा कोणत्याहि परिस्थितीत संतुष्ट होऊ शकत नाही. विषयसुखांच्या अभावामुळे अशांती, दुःख प्राप्त होते; परंतु जेव्हां जेव्हां प्राकृतिक विषय पदार्थांची प्राप्ती होत असते, तेव्हां विषयांची आवश्यकता आणि त्यांना प्राप्त करण्याची इच्छा वाढत जात असते. इतकी अनावश्यक आवशक्यता वाढते की, मनुष्याला क्षणभर देखील शांती मिळू शकत नाही व शांतीशिवाय सुख मिळत नाही.

३) जेवढी विषयांची आवशक्यता वाढत जाते तेवढीच त्यांना प्राप्त करण्याची इच्छा आणि क्रिया होत असते. आणि विषय-भोगांनी माणसाचा विवेक झाकला जातो, तेव्हां तो विवेकभ्रष्ट होऊन हजारो मार्गांनी आणि जलदगतीने नाशाकडे ओढला जातो.

४) विवेकभ्रष्ट माणूस, होणाऱ्या परिणामांना विसरतो; ह्याचे काय फळ मिळेल ? हे विचार करण्याची त्याच्या बुद्धीत शक्तीच राहात नाही. तो सहजपणे दुष्कर्म करण्याकडे प्रवृत्त होत जातो; ज्यांना तो स्वतः पूर्वी वाईट समजत असे, ती दुष्कर्मे त्याच्या जीवनाला दुष्कर्ममय बनवितात.

५) जेव्हां माणसाची बुद्धि भ्रष्ट होते तेव्हां त्याला सर्व वाईटच दिसत असते. त्याची नजर वाईट वस्तूवर, वाईट कर्मावरच फक्त केंद्रित झालेली असते व त्यांना तो आपल्या कार्यसिद्धीसाठी आवश्यक साधन मानतो, एवढेच नव्हे तर त्यांना आपल्या आदरणीय वस्तू मानतो. ह्या अवस्थेत त्याची वस्तुतः चांगल्या कामांत, सत्पुरुषांच्या संगतीत, सत्स्थानांत, चांगल्या गोष्टीत, चांगल्या अभ्यासात आणि चांगल्या वाता-

वरणाबद्दल फक्त तिरस्कारच उत्पन्न होत नाही परंतु हे सर्व त्याला व्यर्थ दिसतात. त्याचप्रमाणे वाईट व त्याज्य गोष्टीत त्याचे मन रमते. तो चांगल्या सहवासांत राहणेच पसंत करीत नाही.

६) अशा चांगल्या गोष्टींना वाईट व वाईट गोष्टींना चांगला समजणारा विपरीत बुद्धीचा मनुष्य दुःखापासून सुटका करण्यासाठी सतत विचार करीत असतो; कर्म करीत असतो परंतु तो जे करतो त्यापासून दुःखाची आणखीच वृद्धि होते. त्याचे चंचल मन निरंतर सुखाच्या खोट्या, दुःख निर्माण करणाऱ्या विषयसुखांतच लागलेले असते. त्याच्या जीवनांत अंधकार, दुश्चिंता, अशांति, अधर्म यांचा फैलाव होतो. त्यांच्या उपद्रवाने त्याला भौतिक असफलता प्राप्त होऊन मृत्यूपेक्षाहि कठीण अशा अवस्था प्राप्त होत असतात. असफलतेतही त्याची विषयसुखलालसा, त्याची दुश्चिंता, अशांति, अधर्म आणि अंधकार वाढत जातो. अशा अशांत, चिंतामय व पापमय स्थितींत त्याच्या आयुष्याचे दिवस पूर्ण होत जातात. आणि मृत्युस्थितीतहि तो शेकडो-हजारो दुश्चिंतांनी आणि दुर्भावनांनी फसून फार मोठ्या दुःखाचा त्रास सहन करून पापांचे ओझे बरोबर घेऊन यमदरबारात प्रवेश करतो.

७) ह्याप्रमाणे या माणसाची मृत्यूनंतर दुर्गति होते; त्याला दुःख-ताप व अज्ञानी आसुरी अशी योनि प्राप्त होते; आणि त्यानंतर भीषण अशा नरकयातना भोगाव्या लागतात. मनुष्य जीवनाची ही अवस्था फार भयानक अशी व सर्वांत वाईट अशी आहे.

८) मनुष्यजीवनाचे सार्थक यांत आहे की—मनुष्य मानव जातीचे खरे साधन-भगवत्प्राप्तीचा लाभ घेणे—ज्यामुळे सर्व अशांति, सर्व चिंता आणि सर्व दुःखांपासून मुक्त होऊन परमानंदमय अक्षय भगवत् स्थितीला प्राप्त करणे. हे केव्हां घडेल..? विषय भोगांविषयी वैराग्य आणि तिरस्कार प्राप्त झाल्यावर आणि भगवंताविषयी प्रेम व विश्वास संपादन केल्यावर !

"शिव."

*—*—*—*

## (३) कोण दुजा गुन्ता उकलाया ?

चंचल पवनी कांपे काया
नाही मुरारी तुजला माया ॥ ध्रु. ॥
इथे उभी मी यमुनाकाठी
तरी न दिससी तू जगजेठी !
भिवविति मजला संध्याछाया. १
सवत्स धेनू घरीं परतल्या
हवे तयांना जल पाजाया !
इथे गुंतले तुजसी राया. २
हिणवितील मज सख्या गवळणी
गेली ही आणाया पाणी !
सखा जिवाचा कीं शोधाया ? ३
गुंतुनियां मन हरिसी पडले
जिवाशिवाचे नाते जडले !
कोण दुजा गुन्ता उकलाया ? ४

—श्री. तु. नाईक


॥ श्रीसाईप्रसन्न ॥

## ॥ साईकृपा ॥

**सर्व प्रकारच्या जुनाट रोगांवर खात्रीपूर्वक इलाज !**

जुनाट संधिवात, उसण, शूळ, गॅस्ट्रिक आजार, दमा, ब्लडप्रेशर, अल्सर, स्त्रियांचे आजार, मधुमेह, व सर्व प्रकारचे लहान मुलांचे आजार, यांवर खात्रीपूर्वक इलाज केला जाईल. रुग्णांनी आपले वय, रोगाचे वर्णन, व किती वर्षे रोग आहे हें लिहिल्यास पोस्ट पार्सलने औषधे पाठविली जातील. रोगाप्रमाणे औषधाचे कोर्स करून रोग बरा केला जातो. घेण्यास सुलभ व गुणकारी औषधयोजना. अनुभव हीच खात्री. सर्वप्रकारच्या रुग्णांनी अवश्य फायदा घ्यावा.

पोस्टेजसह कोर्स किमत एक महिना रु. ४०–३०, दोन महिने रु. ७५–६०, तीन महिने रु. १००–५०, मनीऑर्डर किंवा चेक स्वीकारले जातात. औषधाबरोबर तीं घेण्याची रीत व माहिती कळविली जाते. लिहा / भेटा :—संचालक, साई ( सेवाश्रम ) दवाखाना, साईसदन्, कॅनरा बॅंकेमागें, शिवाजीउद्यान, शहापूर, बेळगांव.

# श्री गोंदवलेकर महाराज–व्यक्तिदर्शन

## ( चालू लेखमाला )

श्री. पु. मु. अत्रे

काळे नांवाचे शाळाइन्स्पेक्टर गोंदवल्यावरून पुष्कळदां जात असत. श्रीमहाराजांचा पारमार्थिक अधिकारही त्यांनी अनेकांकडून ऐकला होता. पण ते फक्त अध्यात्माच्या चिकित्सेंतच रस घेणारे असल्यामुळे कधींहि श्रीमहाराजांच्या दर्शनास थांबले नव्हते. त्यांच्या कुटुंबाला सांधेदुखीनें पंगूपणा आला होता व त्यावर औषधांचा मारा केला तरी गुण येत नव्हता. सत्पुरुषाच्या कृपेनें कांहीं झाले तर पहावे या विचाराने शेवटी ते कुटुंबाला घेऊन प्रथमच श्रीमहाराजांच्या दर्शनास आले व आपला हेतु निवेदन केला. श्रीमहाराजांनी एक काढा लिहून दिला. त्यामुळे काही दिवसांनी त्या बाई बऱ्या होऊन गोंदवल्यास पायी जाऊन त्यांनी श्रीमहाराजांच्या चरणांवर डोके ठेवले. काळेयांनाही महाराजांची योग्यता प्रत्ययास आली. पुढे त्यांना अनुग्रह घेण्याची उपरती झाली, पण तो साक्षात् देवाकडूनच मिळावा असा त्यांचा आग्रह होता. श्रीमहाराजांनी त्यांना काही दिवसांनी सकाळींच स्नान करून येण्यास सांगितले तेव्हां त्यांना आनंद झाला. स्नान करून त्यांनी मनोभावानें श्रीरामरायाची षोडशोपचारे पूजा केली. श्रीमहाराजांनी कागदावर 'श्रीराम जय राम जय जय राम' हा मंत्र लिहिलेला कागद मारुतीच्या तोंडाला तेल-शेंदरानें चिकटवून उजवा कान तिथे लावण्यास श्री. काळे यांस सांगितले व त्यांनी ते केले. तेव्हां त्यांना 'श्रीराम' हा शब्द स्पष्टपणे ऐकायला आला व आपल्याला देवाकडूनच नाम मिळाल्याचे समाधान त्यांना झाले.

### भाऊसाहेब तुम्ही इकडे कुठें ?

रामनवमीच्या उत्सवाला श्रीराम महाराजांनी वेळधडीस यावे अशी श्रीब्रह्मानंदांनी, आणि श्रीदत्ताची प्रतिष्ठापना करण्यास यावंगलला यावे अशी शिवदीक्षितांनी

विनंती केल्यावरून ते गदगला सन १९०१ च्या एप्रिल महिन्यांत गेले. गदगला श्रीब्रह्मानंदांचे वास्तव्य बरीच वर्षे होते. त्यांचे वैराग्य, तपश्चर्या व ब्रह्मनिष्ठा यामुळे ते कर्नाटकांत आदर्श सत्पुरुष मानले जात होते. त्यांचे गुरुदेव येणार म्हणून प्रतिष्ठित व अधिकारी मंडळी श्रीमहाराजांना स्टेशनवर सामोरी गेली होती. जनार्दनपंत आठवले या प्रसिद्ध वकिलांच्या घरी उतरण्याची सोय केली होती. दिवाणखान्यांत बैठक घातली होती. गादीवर लोडाला टेकून श्रीमहाराज बसले व त्यांच्या डाव्या उजव्या बाजूला मंडळी बसली. भाऊसाहेब केतकर उजव्या बाजूस समोरच होते. त्यांच्याकडे श्रीमहाराजांची दृष्टि जाऊन त्यांनी विचारले, "भाऊसाहेब, तुम्ही इकडे कसे?" त्यांना नांवाने हाक मारल्याने ते बुचकळ्यात पडले; कारण आपण तर त्यांना भेटलेले आठवत नाही आणि हे तर घरगुती बोलत आहेत! तेव्हां श्रीमहाराजांनीच २५ वर्षापूर्वीच्या गोंदवल्याच्या आठवणी दिल्या व विचारले, "गीतेचा नववा अध्याय रोज वाचता का?" "होय, बहुतेक वाचतो" असे भाऊसाहेबांनी म्हटल्यावर श्रीमहाराज म्हणाले, "म्हणूनच इतक्या वर्षांनी आपली पुन्हां भेट झाली!" दुसऱ्या दिवशी ते म्हणाले, "महाराज, सर्वांपेक्षा 'माझा हक्क' जास्त आहे. आपण सर्वांनी माझ्याकडे यावे." श्रीमहाराज म्हणाले, "आलो असतो, पण या मंडळींनी मला येथे आणले आहे तेव्हां त्यांच्याकडेच राहणे योग्य दिसेल. परत येतांना मी जरूर तुमच्याकडे येईन." नंतर बेलधडीला जाऊन रामनवमी व हनुमज्जयंती झाल्यावर श्रीमहाराज शंभर मंडळींसह भाऊसाहेबांच्याकडे उतरले. सरकारी बंगल्याच्या अंगणात प्रशस्त मांडव घातला होता. बंगल्यात विहीर खोदण्याचा मुहूर्त श्रीमहाराजांनी कुदळ मारून केला. विहिरीला भरपूर पाणी लागले—इतके की गांवातील लोक ते हलके व पाचक म्हणून अद्याप पिण्यासाठी नेत असतात. श्रीरामहाराजांच्या पुनर्भेटीचा योग भाऊसाहेबांना त्यांच्या ५० व्या वर्षी आला म्हणून ते मंडळींना म्हणाले, "काय सांगू तुम्हाला! हरवलेली आई मुलाला अनेक वर्षांनी भेटली म्हणजे जे काय त्याला होते तसे मला झाले आहे! आता पेन्शन घेतल्यावर काय करावे याची मला मुळीच विवंचना राहिली नाही. गोंदवल्यास जायचे, पेन्शन श्रीमहाराजांच्या हवाली करायची व ते सांगतील तशी कालक्रमणा करायची!"

पुढे श्रीमहाराज यावंगलला गेले. येथे शिवदीक्षितांच्या परिश्रमांनी दत्त-मंदिराची वास्तुपूजा व मूर्तीची प्राणप्रतिष्ठा श्रीमहाराजांच्या करवीं झाली. चार दिवस उदंड अन्नदान झाले. एक विहीर बांधली होती तिला खर्च फारच झाला,

पाणीही खूप लागले, पण मचूळ. म्हणून शिवदीक्षितांनी श्रीमहाराजांना विहीर पाहण्याची विनंती केली. ते म्हणाले, भगवंताच्या चरणांशी मचूळ पाणी असेलच कसें ? विहिरीत श्रीदत्ताचे तीर्थ घाला." असे म्हणून स्वतःच विहिरीत तीर्थ सोडले आणि पाणी काढून चूळ भरली व म्हटले, "पाणी तर गोड आहे ! " सर्वांना तसाच अनुभव आला.

**श्रीमहाराज मनुष्य नाहीत, साक्षात् मारुती आहेत ! :**

कुच्चीला ज्यांच्याकडे श्रीमहाराज उतरले होते तेथे एक उत्सव सुरू झाला. रोज हजारो लोक दर्शनाला येत व त्यांच्या पारमार्थिक आणि प्रापंचिक समस्यांचे निराकरण समाधान मिळेतोंपर्यंत होत असे. पण प्रत्येकाला शेवटी रामनाम घेण्याचा श्रीमहाराज उपदेश करीत. कृष्णाजीपंत भागवत नांवाचे एक चिकित्सक गृहस्थ होते. त्यांचे मत असे की, "कलियुगात माणसे इंद्रियाधीन आहेत. तेव्हां जे आपणाला भगवद्भक्त म्हणवतात ते भोंदू, धूर्त व स्वार्थी असून लोकांच्या भोळेपणाचा फायदा घेतात व कष्ट न करतां त्यांच्या जिवावर गलेलठ्ठ होतात." श्रीमहाराजांच्या साधुत्वाची परीक्षा घेण्याचा कृष्णाजीपंतांनी निश्चय केला. तीन दिवस ते श्रीमहाराजांच्या दर्शनास येऊन व एका कोपऱ्यात बसून महाराज काय करतात हे बारीक नजरेने पहात होते. त्यांना असे समजून चुकले की प्रपंचाच्या संवादाशिवाय ज्ञान, वैराग्य इत्यादि पारमार्थिक बाबतीत हे काहीएक बोलतच नाहीत, तेव्हां हे साधु निश्चित नाहीत. असा विचार करून पंत श्रीमहाराजांना म्हणाले, "बुवा, हे तुम्ही काय मांडले आहे ? लोकांना नादी लावून व त्यांच्या जिवावर रोज पक्वान्ने झोडून पुष्ट होण्याचा धंदा सोडा, नाहींतर तुमचे साधुत्व तरी दाखवा." आनंदून श्रीमहाराज म्हणाले, "आपले बोलणे मला एकदम पटले, पण काय हो, माझ्याजवळ जे आहे ते तुम्हाला दाखवल्यावर तुम्ही मला काय द्याल ?" पंतांनी उत्तर दिले, "जर तुमचे खरे साधुत्व माझ्या अनुभवास आले तर तुमच्या चरणी मी आपला जीव ओवाळून टाकीन !" श्रीमहाराज फक्त 'बरे' म्हणून स्वस्थ बसले. दुसऱ्या दिवशी पंत दिसले नाहीत म्हणून त्यांना घेऊन येण्यास महाराजांनी एकाला पाठविलें. कपाळशूल उठल्यामुळे पंत डोके करकचून आवळून त्रस्तपणे पडले होते. पण निरोप ऐकून कसेबसे ते श्रीमहाराजांकडे आले. त्यांनी नमस्कार केल्यावर महाराजांनी सहज पंतांच्या डोक्यावरून हात फिरवतांच त्यांच्या वेदना पार गेल्या. श्रीमहाराज म्हणाले,

" मला चिकित्सक लोक मनापासून आवडतात. आतां तरी तुम्हांला खात्री माझी पटली का ? " पंत लगेच त्यांना उडवून म्हणाले, " छे छे ! यांत काय खात्री पटण्यासारखें आहे ? यांत ' साधुत्व ' कोठे आहे ? हा मंत्रतंत्राचा प्रकार दिसतो ! " श्रीमहाराज म्हणाले, " अगदी योग्य सांगितलेत तुम्ही. पण मला असे सांगा की सामान्य माणसा-जवळ नसणारी अशी कोणती गोष्ट साधूजवळ असते व ती ओळखायची कशी ? " या विषयावर दोघांचा चांगला दीड तास संवाद चालला होता. एकाएकी पंत ' अरे बापरे ! ' असे ओरडून जे धूम पळू लागले ते गांवाबाहेर आल्यावर थकले म्हणून थांबले. तेव्हां कोठे मागून हाक मारीत येणारा माणूस त्यांना उमगला. तो म्हणाला, ' श्रीमहाराज तुम्हाला बोलावताहेत ! तुम्ही एकाएकी धावत का सुटला ? " पंत म्हणाले, " अहो, काय सांगू ? ते माणूस नाहीत, प्रत्यक्ष मारुति आहेत ! मला ते चक्क तसे दिसले. त्यांच्यासमोर यायचा मला धीरच होत नाही ! " बोलतांना सारखे लट् लट् कापून अडखळत होते. त्यांना कसाबसा धीर देऊन श्रीमहाराजांकडे आणले. पहातात तो काय श्रीमहाराज अगदी सौम्य व शांत ! तात्काळ त्यांना ढसाढसां रडू फुटले व त्यांनी महाराजांच्या चरणांवर लोळण घेतले. श्रीमहाराजांनी त्यांना अभय देऊन उठविले व म्हटले, " पंत, तुम्ही, फार भाग्यवान आहांत. तुम्ही अखंड नाम घ्या. ज्याच्या मुखीं राम आहे त्याच्या हृदयांत मी आहें. "

अक्कलकोटच्या श्रीस्वामी समर्थांचे पट्टशिष्य श्रीकाळबोवा देखील श्रीमहा-राजांबद्दल बोलतांना एकदा म्हणाले, " रामरायाच्या डाव्या बाजूला एक लहानशी खोली आहे. त्यांत पलंगावर केवढें मोठें माकड बसलें आहे ! अरे बापरे ! ! हा तर रामदास हनुमान ! ! !

( अपूर्ण )

# साईमहिमा

अवताली भवताली, दाटला उदीचा धूर
साईसामर्थ्याचे, हे शिर्डी पंढरपूर ॥ ध्रु. ॥

साई सामर्थ्याचे मला दिसतं पंढरपूर
साई साई नामाचा चालला गजर
दासगणू महाराज, करिती साईचे कीर्तन
वेडा दिनू नाचे, साईच्या स्मरणांत
साई सामर्थ्याचे, स्मरण सर्व भाविकांत ॥ १ ॥

भक्ताच्या संकटवेळी, श्रीसाई धावतात
भक्ताची चिंता, स्वतः निवारतात
भक्ताच्या भल्याकरितां, श्रीसाईजागृत
वेळी दृष्टान्त देऊन, भक्तांना तारितात ॥ २ ॥

साईचे चिंतन, हेच आमुचे जीवन
साई साई म्हणतां, होई मन प्रसन्न
साईच्या नामाचा, केवढा प्रताप
साईच्या स्मरणानें, मी झालों क्लेशमुक्त ॥ ३ ॥

उदीचा महिमा, काय वर्णू मी नाथा
स्मरुनी भालीं लावितां, हरली भवभय व्यथा
उदीच्या प्रतापानें, रोग पीडा होई दूर
खऱ्या निष्ठावंताची, होईल क्लेशपीडा दूर ॥ ४ ॥

साईच्या कृपेनें, मी होईन संकट मुक्त
जन्मोजन्मीं घडो सेवा, साईच्या भक्तींत
साईच्या कृपेविन, वेडा होईल दिनूदास
दयाळू साईनाथ, संकटीं तारतील दिनूस ॥ ५ ॥

साईभक्त
दिनकर शिर्के
५१/१६१८, नेहरुनगर
कुर्ला (पूर्व) मुंबई–२४.

# "अनंत-पूजन"

संसारातील कथा अखेरी संसारीच विरणार।
अपूर्णतेतिल राज्यचि अवघे अपूर्णचि असणार ॥ १ ॥

मृगजळातल्या जलप्राशाने तृषा कशी शमणार।
तसेच चित्रातील अन्नाने उदर कसे भरणार ॥ २ ॥

कटु बीजातील अंकुरातुनि कटुता उद्‌भवणार।
शुद्ध बिजाचे पोटी परंतु गोडिच रसरसणार ॥ ३ ॥

अविवेकातिल संभ्रमामध्ये अतृप्तीच वसणार ।
अंगीकृत हा खेळ आशेचा अपेशीच ठरणार ॥ ४ ॥

पूर्वदिशेतिल अनुपम शोभा पूर्वेसचि दिसणार ।
ईशकृपेचे वैभव सारे भक्तचि अनुभविणार ॥ ५ ॥

अंतरंगिचे अनंत-पूजन अभंगचि असणार।
विसर्जनाचे बंधन मोक्षी कधी न संभवणार ॥ ६ ॥

" भगवान श्रीसाईनाथार्पणमस्तु "

शाम जुवळे

# नमन श्रीदत्तगुरू शतबार

त्रिगुणात्मक यह त्रिमूर्ति गुरुदत्तावतार
नमन श्रीदत्तगुरू शतबार ॥ टेक ॥

ब्रह्मा विष्णु और महेश्वर
अनसूया के सुपुत्र सुन्दर
"गुरुचरित्र" के नित्य पठन से टूटे बंध हजार ॥ १ ॥

"दत्तमंत्र" का घोष करे हम
अंतरमन का दूर करे तम
मन-मंदिर में होवे दर्शन "दत्तगुरू" साकार ॥ २ ॥

ध्यान गुरू का, मैंने पाया
पुलकित मेरी सुंदर काया
आनंदित हो बहते आंसू नैनों से हर बार ॥ ३ ॥

जो करते हैं गुरू की सेवा
मिलता उनको सुन्दर मेवा
गुरुकृपा से नैया उनकी लगती भव के पार ॥ ४ ॥

—राधाकृष्ण गुप्ता "चेतन"
डोंबिवली (पूर्व)

# अनंतता

## (गुरुदेव न्यायरत्न विनोद यांच्या अभंगावरील विवेचन )

' जरा जाऊ पुढे, ' असे सांगूनिया
निर्जन स्थळी या, आणिलीत
असा तुमचा हेतू, मला नव्हता ठावा
साधलात कावा, तुम्ही मात्र
कुठे ही का न्या ना, मिळेल ना प्रीती
जरी मी सांगाती, जन्मजन्मी
मी ही अनंतता, तुमचे ते जीवित
सदा मर्यादित, असायाचे

(अ. सं. पृ. ३३)

भक्तिमार्गात ' श्रवणं, कीर्तनं, विष्णोः स्मरणम् पादसेवनम् । , ' अर्चनं वंदनं दास्यम्, सख्यं आत्मनिवेदनम् ।। अशी नवविधा भक्ति सांगितलेली आहे. साधक याच्याही काकणभर पुढे जाऊन परमेश्वराशी एकरूपच होतो. ईश्वरी साक्षात्कारा-करिता एक एक पाऊल टाकीत टाकीत पुढे जावे लागते. की, ज्या ठिकाणी एक परमेश्वर स्वरूपाशिवाय अन्य काही दिसतच नाही. भगवंताने असे सांगितले आहे की " यद् गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम " म्हणजे साधक माझ्याप्रत आल्यावर पुन्हा परत जावयाचा उरणारच नाही. याचाच अर्थ त्याला पुनर्जन्म नाही. परंतु या ठिकाणी सुद्धा तो विवक्षित मर्यादेपर्यंतच येतो व माझ्या चरणी लीन होताच त्याचे जन्ममरण वगैरेचे गूढ संपते. तीच जणु काही त्याची अनंतता असते. अशा वेळी ती अनंतताच त्याला सांगू लागते की ' हे साधका, आपण जरा पुढे जाऊ असे सांगत सांगत मला तुम्ही या एकांत स्थळी म्हणजे या जगताच्या उगमाशी घेऊन आलात. एक प्रकारे मला तुम्ही फसवलेच आहे परंतु या फसविण्यातही तुमची, या अनंततेचे म्हणजे माझेच, म्हणजे या ब्रह्मगोलाचे गूढ उकलण्याची उत्कटता, आतुरता मला दिसून आली. हीच उत्कटता, हेच प्रेम मला जन्मोजन्मी मिळत राहो. परंतु परंतु येथून पुढे जन्म नाही; तेव्हा आपले हे एकरूपत्व अखंडतेने मर्यादित राहो.

निवेदक—चिपळूणकर गुरुजी.

# शिरडी-वृत्त

## नोव्हेंबर १९७३

या महिन्यात श्रीसाईबाबांचे समाधी दर्शनाकरिता बाहेरगावची भक्त मंडळी बरीच आली होती. शिवाय महिन्यांतील काही गुरुवार, रविवार व सुट्टीचे दिवशी अलोट गर्दी उत्सवाप्रमाणे झाली होती. काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

कीर्तन :— १) संस्थान गवयी काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.

२) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, मु. शिर्डी यांचे कीर्तन झाले.

प्रवचन :— १) ह. भ. प. निवृत्ति हनुमंतराव पाटील गोंदकर, मु. शिर्डी यांचे प्रवचन झाले.

गायन, वादन वगैरे कार्यक्रम — १) कु. प्रभा अत्रे, मुंबई. २) श्री. उत्तम नाना शिंदे, जामखेड. ३) श्री. शाहीर बळीराम दांडूक, मुंबई. ४) श्री. रमेश त्रि. मराठे, गोवा. ५) सौ. शोभा गुर्टू, मुंबई. ६) श्री. नारायणराव इन्दोरकर; मुंबई. ७) श्री. अनंत राणे, मुंबई. ८) श्री. पुष्पराज रा. कोष्टी, मुंबई, ९) श्री. अशोक म्हात्रे, मुंबई. १०) सौ. मीरा कल्याणी, मुंबई. ११) श्री. सत्यसाई भजन मंडळी, पुणे. १२) श्री. अनंतराव का. पेडणेकर, मुंबई. १३) श्री. अंकुश कृ. मालवणकर; मुंबई १४) श्री. शंकरराव प. भरवळ, मुंबई. १५) श्री. एम्. व्ही. रामचंद्रन, बंगलोर.

कार्तिकी महाएकादशी :— कार्तिकी महाएकादशी निमित्त श्रींचे समाधिमंदिरात कीर्तन, रात्रौ श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक भारूड, गारूड कार्यक्रम झाले.

तुलसीविवाह :— श्रीद्वारकामाईत तुलसीविवाह कार्यक्रम सालाबादप्रमाणे झाला.

सन्माननीयांच्या भेटी :—

१) मा. श्री. के. व्ही. शेषाद्री, व्हाईस चेअरमन महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन, मुंबई.

२) मा. श्री. एम्. डी. कांबळी, चॅरिटी कमिशनर महाराष्ट्र राज्य मुंबई.

३) मा. श्री. एन्. एल्. अभ्यंकर जज्ज प्रेसिडेंट इंडस्ट्रियल अॅण्ड लेबर कोर्ट, मुंबई.

४) मा. श्री. भारदेसाहेब, माजी सभापती महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

हवापाणी :—पहाटे गारठा पडू लागला आहे. हवा चांगली आहे. रोगराई काही नाही.

## साईभक्त श्री. श्रीराम सातर्डेकर यांचा सत्कार

यंदांच्या दसरा उत्सवात शिर्डी येथे मुंबईतील एक गायक श्री. श्रीराम विष्णू सातर्डेकर यांनी आपल्या भक्तिगीत गायनाचा कार्यक्रम श्री. बाबांच्या समाधिमंदिरात सादर केला. श्री. सातर्डेकर हे रामनवमी, गुरुपौर्णिमा व दसरा या तिन्ही उत्सवप्रसंगी मुद्दाम शिर्डीस येऊन आपल्या गायनाचा कार्यक्रम करतात. यंदांचा त्यांचा हा ५१ वा कार्यक्रम होता व या प्रसंगी कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक यांचे अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यात येऊन ३५२ रु. ची प्रेमाची भेट त्यांना अर्पण करण्यात आली. या सत्कारात श्री. मालपेकर व श्री. तातू देसाई यांनी प्रामुख्याने भाग घेतला होता.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशनें

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती कामाच्या सोईकरतां दि. १५–११–७३ पासून पुढीलप्रमाणें ठरविण्यात आल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित (मराठी) | रु. | ८-०० |
| २. | श्री साई सच्चरित (इंग्रजी) | रु. | ५-०० |
| ३. | श्री साई सच्चरित (गुजराती) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित (हिंदी) | रु. | ४-२५ |
| ५. | श्री साई सच्चरित (कानडी) | रु. | ४-२५ |
| ६. | श्री साईबाबा जीवितचरित्रम् (तेलगू) | रु. | ८-०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि (मराठी) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय (मराठी) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना (मराठी किंवा गुजराती) | रु. | ०-२० |
| १०. | श्री. प्रधानकृत चरित्र (इंग्रजी) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत (मराठी) | रु. | २-०० |
| १२. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १३. | शीलधी (मराठी) | रु. | ०-२० |
| १४. | साईबाबा : अवतार व कार्य (अ. य. धोंड) | रु. | १-७५ |
| १५. | शिरडी दर्शन (६६ फोटोंचा आल्बम) | रु. | २-०० |
| १६. | श्री साईलीला मासिक (मराठी किंवा इंग्रजी) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास — | रु. | ०-६० |
| १७. | मुलांचे साईबाबा (द. दि. परचुरे) (मराठी) | रु. | ०-५० |

*

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :— ४०० ०१४.

Regd. No. MH/BYC/26

Sai Baba Tutorial Academy's

# Inter Arts Classes

(1943)

Kshatriya Niwas, Portuguese Church, Girgaon,
Opp. Lakhani Book Depot, Bombay 4. Tel. 354337

*

**The only special Inter Arts Classes in Bombay**

*

100 % Results last 20 consecutive years.

*

Logic, Economics, English, French, Etc.

*

Taught with exhaustive cyclostyled notes.

*

Probable questions with class-getting answers issued every year for the University Examination with 100 % accuracy.

*

Patronised by children of Ministers, Supreme Court, High Court, Small Cause Court Judges, Presidency Magistrates and eminent industrialists.

FRESH BATCHES :—
Starting from 3rd December 1973

HURRY UP ! LIMITED ADMISSIONS !

मुद्रक : **श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,
४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई–१५.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, फ्लॅट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.